वर्ष ५८ वे । अंक १८२ । पृष्ठे ६ । किंमत २ रूपये । शनिवार, २४ जानेवारी २०२६ PR No. G-2/RNP/NND-251/2024-2026 dainiksatyaprabha2015@gmail.com dainik_satyaprabha epaper.satyaprabha.com

दैनिक सत्यप्रभा
बातम्यांसोबत विचार देणारे

### चांदीने पुन्हा गाठला उच्चांक

*नवी दिल्ली : सोने आणि चांदीच्या दरात गुरुवारी मोठी घसरण पाहायला मिळाली होती. मात्र, आज चांदीच्या दराने उच्चांक गाठला आहे. गुरुवारी चांदीचे दर २० हजार रुपयांनी घसरले होते, सोन्याचे दर देखील ४००० रुपयांनी कमी झाले होते. आज सराफा बाजारात चांदीचे दर १९२४९ रुपयांनी वाढले तर सोन्याचे दर ४३०० रुपयांनी वाढले आहेत. ५ मार्चला संपणाऱ्या वायद्याचे चांदीच्या दरात १३००० रुपयांची वाढ झाली.*

### शेअर बाजारात सहा लाख कोटी स्वाहा

*मुंबई : देशांतर्गत शेअर बाजारात आज जोरदार घसरण पाहायला मिळाली. सकाळी बाजाराने सकारात्मक सुरुवात केली होती, पण काही वेळातच परिस्थिती बदलली आणि विक्रीचा जोर वाढला. परिणामी सेन्सेक्स ८०० अंकांहून अधिक घसरला, तर निफ्टीही जोरदार आपटला. घसरणीचा थेट फटका गुंतवणूकदारांना बसला. बीएसईमध्ये लिस्टेड कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल (मार्केट कॅप) ५.७ लाख कोटींनी कमी झाले.*


## त्याग, शौर्य आणि श्रद्धेची महान परंपरा : आजपासून कार्यक्रम ; पासची आवश्यकता नाही

# हिंद-दी-चादर सोहळ्यासाठी नांदेडनगरी सजली !

### गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री फडणवीस यांच्यासह अनेक राज्यांचे मुख्यमंत्री, राज्यातील मंत्र्यांची उपस्थिती

प्रतिनिधी। नांदेड

शीख धर्माचे नववे गुरु, 'हिंद-दी-चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षानिमित्त नांदेडनगरी ऐतिहासिक पर्वाची साक्षीदार ठरणार आहे. राज्य शासनाच्या वतीने २४ व २५ जानेवारी रोजी शहरातील कौठा भागातील विस्तीर्ण मैदानावर भव्य शहिदी समागम सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून, या निमित्ताने संपूर्ण नांदेडनगरी उत्सवमय वातावरणात सजली आहे. या सोहळ्यास केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह देशातील विविध राज्यांचे मुख्यमंत्री, मंत्री, संत-महंत व नामवंत मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. त्यामुळे नांदेडच्या शिरपेचात आणखी एक ऐतिहासिक मानाचा तुरा रोवला जाणार आहे. दरम्यान, २४ व २५ जानेवारी रोजी आयोजित हिंद-दी-चादर हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला असून, दोनही दिवस सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, पान २ वर








#### नांदेडनगरीत इतिहासातील सुवर्णपान

हिंद-दी-चादर श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षानिमित्त नांदेड शहर भक्ती, श्रद्धा आणि त्यागाच्या महान परंपरेने उजळून निघाले आहे. देशभरातील लाखो भाविकांच्या उपस्थितीत हा सोहळा ऐतिहासिक ठरणार आहे. २४ व २५ जानेवारी रोजी होणाऱ्या या कार्यक्रमासाठी ५२ एकर परिसरात भव्य आयोजन करण्यात आले आहे. गुरुद्वाराची प्रतिकृती, सेवा, आरोग्य व सुरक्षा व्यवस्थेमुळे नांदेड सज्ज झाले आहे.

#### हिंद-दी-चादर : बलिदानाचा अमर संदेश

धर्मस्वातंत्र्य आणि मानवतेसाठी श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांनी दिलेले बलिदान आजही देशाला सहिष्णुतेचा मार्ग दाखवते. त्यांच्या शहिदीची आठवण नांदेडच नव्हे तर देशभरातील नव्या पिढीपर्यंत पोहोचणार आहे. शीख समाजासह बंजारा, सिकलीगर, लबाना, मोह्याल, सिंधी आदी समाजांचा या ऐतिहासिक सोहळ्यात सहभाग आहे. त्याग, साहस आणि सेवाभावाची परंपरा नांदेडमधून सर्वदूर पोहोचणार आहे.

#### अनेक मुख्यमंत्री, मंत्री उपस्थित राहणार

या ऐतिहासिक कार्यक्रमाला केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान, हरियाणाचे मुख्यमंत्री नायबसिंग सैनी, दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांच्यासह अनेक मान्यवर मंत्री आणि वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी तसेच देश-विदेशातून लाखो भाविक येणार आहेत. या पार्श्वभूमीवर सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे. गेल्या काही महिन्यांपासून या सोहळ्याची तयारी सुरु आहे.

#### वाहतूक मार्गात तात्पुरता बदल

या सोहळ्यानिमित्त भाविक मोठ्या संख्येने येणार असल्याने शहरात वाहतुकीची कोंडी निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी २४ आणि २५ जानेवारी रोजी सकाळी सहा ते रात्री दहापर्यंत शहरातील वाहतूकीत बदल केले आहेत. पोलीस प्रशासनाने दिलेल्या पर्यायी मार्गांचा वापर करून प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

#### मिरवणुकीवर हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी

या कार्यक्रमाच्या अनुषंगाने शनिवारी सकाळी श्री गुरु ग्रंथ साहिब येथून नगर कीर्तनाचे आयोजन करण्यात आले आहे. हे भव्य महानगर कीर्तन सकाळी आठ वाजता गुरुद्वारा गेट क्रमांक १ येथून प्रारंभ होऊन गुरुद्वारा चौक महावीर चौक वजिराबाद मार्केट वजिराबाद चौक तिरंगा चौक रामसेतू दादरा रवी नगर नागार्जुन पब्लिक स्कूल मामा चौक या मार्गाने मोदी मैदान मुख्य कार्यक्रमस्थळी पोहोचणार आहे. यावेळी हेलिकॉप्टरच्या माध्यमातून पुष्पवृष्टी करण्यात येणार असून या मार्गावरील सर्व नागरिकांनी आपल्या घरांसमोर व दुकानांसमोर रंगीबेरंगी फुले, रांगोळी, विद्युत रोषणाई व दिव्यांच्या माध्यमातून सजावट करून पालखीचे स्वागत करावे व या भव्य महानगर कीर्तनात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

#### नांदेड तालुक्यातील शाळांना आज सुट्टी

या सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर भाविकांच्या सोयीसाठी तसेच वाहतूक व सुरक्षा व्यवस्थेच्या दृष्टीने शनिवारी (दि. २४) रोजी नांदेड तालुक्यातील सर्व शाळांना सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. तसेच नांदेड तालुक्यातील अनुज्ञप्तिधासरक देशी व विदेशी दारू विक्री करणारी सर्व दुकाने शनिवार आणि रविवार या दोन दिवशी बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

## कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे : खा. चव्हाण



**नांदेड :** हिंद- दी चादर श्री गुरु तेग बहादूर साहेबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षानिमित्त शनिवार आणि रविवारी आयोजित करण्यात आलेल्या ऐतिहासिक कार्यक्रमाची तयारी पूर्ण झाली असून माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी यानिमित्ताने कौठा भागातील ५२ एकरवरील मोदी मैदानावर उभारण्यात आलेल्या विविध सोयी सुविधांची आज पाहणी केली. तसेच या ऐतिहासिक कार्यक्रमाला उपस्थित राहण्यासाठी केंद्रीयमंत्री अमित शहा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह विविध राज्यांचे मुख्यमंत्री, पान २ वर

## विविध २० ठिकाणांहून मोफत बससेवेची सुविधा

**नांदेड :** 'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागम वर्षानिमित्त मोदी मैदानावर २४ व २५ जानेवारी रोजी भव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास भाविक व नागरिकांना सहजपणे उपस्थित राहता यावे, यासाठी शहर व परिसरातील एकूण २० ठिकाणांहून मोदी मैदानापर्यंत मोफत बससेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. ही बससेवा रेल्वे स्टेशन, बसस्थानक, पासदगाव-तरोडा नाका, सांगवी-चैतन्यनगर, शंकरराव चव्हाण चौक-साठेचौक, सिडको-लातूर फाटा, धनेगाव-वाजेगाव, राजकॉर्नर-शिवाजीनगर, सराफा चौक-जुना कौठा मोंढा, ढवळे कॉर्नर-सिडको, लिंबगाव-छत्रपती चौक-मोर चौक, नाळेश्वर, आसना-राजकॉर्नर, विष्णुपुरी, कामठा-नमस्कारचौक, हडको, निळा-जयभवानी चौक, सोनखेड-वाडीपाटी-विष्णुपुरी, उस्माननगर-वडगाव-सिडको तसेच मारतळा-जवाहरनगर-तुप्पा-चंदासिंग कॉर्नर येथून कार्यक्रम स्थळापर्यंत देण्यात आली आहे. या मोफत बससेवेचा लाभ घेवून सर्व नागरिकांनी कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

## वसंत पंचमी

### श्री विठ्ठल-रुक्मिणीचा शाही विवाह सोहळा



**पंढरपूर :** वसंत पंचमीच्या पावन पर्वावर, शुक्रवारी पंढरपूर येथे परंपरेनुसार श्री विठ्ठल आणि माता रुक्मिणी यांचा शाही विवाह सोहळा भक्तिभावात आणि उत्साहात पार पडला. या मंगल प्रसंगासाठी मंदिर समितीकडून जोरदार तयारी केली होती, हजारो भाविकांच्या उपस्थितीत हा सोहळा संपन्न झाला. विठ्ठल मंदिर आणि परिसर आकर्षक विद्युत रोषणाईने उजळून निघाला होता. विवाह विधींसाठी विठ्ठल मंडपात खास सजावट करण्यात आली होती.

## संक्षिप्त

### त्रिभाषा धोरण समिती, चारपर्यंत मुदतवाढ

**मुंबई :** राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या अनुषंगाने राज्यातील शाळांमध्ये त्रिभाषा धोरण निश्चित करण्यासंदर्भात शिक्षणतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीच्या कार्यकाळास चार फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. शालेय शिक्षण विभागामार्फत याबाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. या समितीस आधी चार जानेवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

### बर्फवृष्टीचा हाहाकार, वैष्णोदेवी यात्रा स्थगित

**जम्मू :** जम्मू आणि काश्मीरमध्ये गेल्या २४ तासांपासून सुरू असलेल्या मुसळधार पाऊस आणि जोरदार हिमवृष्टीमुळे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. त्रिकुटा टेकड्यांवर झालेल्या हिमवृष्टीमुळे सुरक्षेच्या कारणास्तव माता वैष्णोदेवीची यात्रा स्थगित करण्यात आली. खबरदारीचा उपाय म्हणून स्थानिक प्रशासनाने अनेक जिल्ह्यांतील शाळा बंद ठेवण्याचे आदेश दिले असून वाहतूक व्यवस्थाही कोलमडली आहे.

### झारखंड चकमकीत २१ नक्षली ठार

**रांची :** झारखंडमधील सारंडा जंगलात लपून बसलेल्या नक्षलवाद्यांच्याविरोधात गुरुवारपासून सुरु असलेल्या कारवाईत म्हणजे ३६ तास चाललेल्या चकमकीत आतापर्यंत २१ नक्षलवादी ठार झाले आहेत. गुरुवारी १५ जणांचा मृत्यू झाल्याची पुष्टी झाल्यानंतर शुक्रवारी आणखी सहा मृतदेह सापडले. दोन कोटी रुपयांपेक्षा जास्त बक्षीस असलेला नक्षलवादी अनल २५ सैनिकांसह येथे वेढला गेला होता. अनलसह २१ जणांना ठार मारण्यात आले आहे.

### शिवचरित्र कथाकार अनिल बडवे कालवश

**पंढरपूर :** विचारवंत, सिद्धहस्त लेखक आणि वारकरी संप्रदायातील एक ज्येष्ठ व्यक्तिमत्व अनिलकाका बडवे यांचे आज निधन झाले. शिवचरित्र कथाकार संत प्रल्हाद महाराज बडवे यांचे वंशज असलेल्या अनिलकाकांच्या जाण्याने वारकरी संप्रदाय आणि हिंदुत्ववादी चळवळीचे मोठे नुकसान झाले आहे. वारकरी संप्रदायातील एक मोठे नाव आणि शिवचरित्राचे गाढे अभ्यासक, संशोधक, लेखक म्हणून त्यांची ख्याती संपूर्ण महाराष्ट्रभर होती.

## सोलापूरमध्ये उबाठा उमेदवारांचे अर्ज बाद

वृत्तसंस्था। सोलापूर

सोलापूर जिल्हा परिषद निवडणुकीत उद्धव ठाकरे गटाला मोठा धक्का बसला आहे. शिवसेने (उबाठा) च्या तीन उमेदवारांचे अर्ज निवडणूक अधिकाऱ्यांनी बाद केल्यामुळे राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. या निर्णयाविरोधात ठाकरेंच्या नेत्यांनी तीव्र आक्षेप नोंदवत निवडणूक प्रशासनावर पक्षपातीपणाचा आरोप केला आहे. माहितीनुसार, संबंधित तीन उमेदवारांचे अर्ज तांत्रिक त्रुटी, कागदपत्रांतील विसंगती आणि प्रस्तावकांच्या तपशीलात आढळलेल्या चुका यामुळे बाद करण्यात आले. मात्र, या त्रुटी किरकोळ असून जाणीवपूर्वक अर्ज बाद करण्यात आल्याचा दावा शिवसेना उबाठाकडून पान २ वर

## महापौर-उपमहापौर निवडणूक ३० किंवा ३१ जानेवारीला होणार !

वृत्तसंस्था। मुंबई




राज्यातील २९ महापालिकांमध्ये महापौर पदासाठी गुरुवारी आरक्षण जाहीर करण्यात आले असून, त्यानंतर महापौर आणि उपमहापौर निवडीच्या प्रक्रियेला वेग आला आहे. यानंतर आता या निवडणुकांच्या तारखांकडे सर्वांचे लक्ष लागले असून येत्या ३० किंवा ३१ जानेवारी रोजी ही निवडणूक होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. न्यूज १९ या वृत्तवाहिनीने हे वृत्त दिले आहे. अद्याप याची अधिकृत घोषणा मात्र करण्यात आलेली नाही.

आरक्षण जाहीर झाल्यानंतर आता महापौर आणि उपमहापौर निवडीच्या तारखेकडे लक्ष लागले आहे. मीडिया रिपोर्टसनुसार महापौर आणि उपमहापौर पदाची निवड ३० किंवा ३१ जानेवारी रोजी होऊ शकते. यासंदर्भातील अंतिम निर्णय नगरसचिव घेणार असून, त्यानुसार निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला जाईल. मुंबईसह २९ महापालिकांमध्येही याच दिवशी महापौर आणि उपमहापौरांची निवड होणार आहे. मात्र, त्या-त्या महापालिकांमध्ये निवडणुकीची तारीख आणि वेळ निश्चित करण्याचे अधिकार संबंधित विभागीय पान २ वर

## सीमरन बालांकडे पुरुष तुकडीचे नेतृत्व

वृत्तसंस्था। मुंबई

केंद्रीय राखीव पोलीस दलाच्या (सीआरपीएफ) इतिहासात येत्या २६ जानेवारी रोजी प्रथमच एक महत्त्वपूर्ण घटना घडणार आहे. जम्मू आणि काश्मीरमधील २६ वर्षीय सहायक कमांडंट सीमरन बाला नवी दिल्लीत कर्तव्य पथावर होणाऱ्या प्रजासत्ताक दिन संचलनात पूर्णतः पुरुष सीआरपीएफ तुकडीचे नेतृत्व करणार आहेत. प्रजासत्ताक दिन संचलनात सीआरपीएफच्या पुरुष तुकडीचे नेतृत्व करणाऱ्या त्या पहिल्या महिला अधिकारी ठरणार असून, ही घटना दलासाठी तसेच गणवेशातील महिलांसाठी एक ऐतिहासिक टप्पा मानली जात आहे. सहायक कमांडट सीमरन बाला या १४० हून अधिक पुरुष सीआरपीएफ पान २ वर

## महाराष्ट्र सदन घोटाळ्यात छगन भुजबळ निर्दोष मुक्त

### एसीबीनंतर ईडीच्या आरोपातूनही क्लिन चिट

वृत्तसंस्था। मुंबई

महाराष्ट्र सदन घोटाळा प्रकरणात राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) दिलेल्या दिलासादायक निकालानंतर आज सक्तवसुली संचालनालयाच्या (ईडी) विशेष न्यायालयानेही त्यांची या प्रकरणातून निर्दोष मुक्तता केली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून सुरू असलेल्या या कायदेशीर लढाईत भुजबळ यांच्यासाठी हा निकाल अत्यंत महत्त्वाचा मानला जात आहे.

विशेष न्यायालयाचे न्या. सत्यनारायण नवंदर यांच्या कोर्टाने छगन भुजबळ आणि इतरांनी दाखल केलेला निर्दोष मुक्ततेचा अर्ज मंजूर केला आहे. या निकालाचा मुख्य आधार प्रेडिकेट ऑफेन्स हा तांत्रिक मुद्दा ठरला. कायद्यानुसार, जर मूळ गुन्हाच (प्रेडिकेट ऑफेन्स) टिकू शकला नाही किंवा त्यातून आरोपीची मुक्तता झाली, तर त्या आधारावर सुरू असलेली ईडीची मनी लाँड्रिंगची केसदेखील उभी राहू शकत नाही. एसीबीने दाखल केलेल्या प्रकरणात आधीच दिलासा मिळाल्यामुळे ईडीच्या केसमध्येही भुजबळ यांची निर्दोष मुक्तता करण्याचा मार्ग मोकळा झाला. हे प्रकरण २००५ मधील आहे. तेव्हा छगन भुजबळ राज्याचे उपमुख्यमंत्री आणि सार्वजनिक बांधकाम मंत्री म्हणून कार्यरत होते. दिल्लीत महाराष्ट्र सदनाचे बांधकाम करण्यासाठी चमणकर एंटरप्रायजेस या कंपनीला कोणत्याही निविदा प्रक्रियेशिवाय कंत्राट दिल्याचा ठपका त्यांच्यावर ठेवण्यात आला होता. आपल्या पदाचा गैरवापर करून भुजबळ यांनी स्वतःच्या कुटुंबाला आणि मालकीच्या कंपन्यांना आर्थिक फायदा करून दिल्याचा आरोप तपास यंत्रणांनी केला होता. या बदल्यात भुजबळ कुटुंबाला मोठ्या प्रमाणात लाच मिळाल्याचा दावा करण्यात आला होता. या प्रकरणात ११ जून २०१५ रोजी काळा पैसा प्रतिबंधक कायद्यांतर्गत (पीएमएलए) दोन गुन्हे दाखल पान २ वर

### प्रजासत्ताक दिन : कर्तव्य पथ सज्ज, महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचा जयघोष होणार

# वंदे मातरम्‌ची दीडशे वर्षे आणि आत्मनिर्भर भारत !

वृत्तसंस्था। नवी दिल्ली

येत्या २६ जानेवारी रोजी संपूर्ण देश आपला प्रजासत्ताक दिन अभूतपूर्व उत्साहात साजरा करण्यासाठी सज्ज झाला आहे. नवी दिल्लीतील ऐतिहासिक कर्तव्य पथावर या निमित्ताने भारताचे लष्करी सामर्थ्य आणि सांस्कृतिक वैविध्याचे दर्शन घडवणारी भव्य परेड आयोजित करण्यात आली आहे. यंदाचा सोहळा विशेष ऐतिहासिक ठरण्याचे कारण म्हणजे, राष्ट्रीय गीत वंदे मातरम्ला पूर्ण होणारी १५० वर्षे; आणि आत्मनिर्भर - स्वावलंबी भारत ही थीम. या दोन्हीचे औचित्य साधून विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले पान २ वर




#### २,५०० कलाकारांचा महासोहळा

परेडमध्ये भारताच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचे दर्शन घडवण्यासाठी सुमारे २,५०० कलाकार सज्ज झाले आहेत. देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेले हे कलाकार आपली पारंपरिक लोककला, संगीत आणि नृत्याविष्कार कर्तव्य पथावर सादर करतील. विविध राज्यांचे चित्ररथ आणि कलाकारांचे हे सादरीकरण म्हणजे जगासमोर भारताची विविधतेत पान २ वर

#### भव्य परेड आणि विविध राज्यांचे चित्ररथ

यंदा कर्तव्यपथावर एकूण ३० विविध चित्ररथ पाहायला मिळतील. त्या माध्यमातून वेगवेगळ्या राज्यांची संस्कृती आपल्याला दिसेल. प्रत्येक चित्ररथाचे विषय ''स्वतंत्रता का मंत्र : वंदे मातरम्'' आणि ''समृद्धी का मंत्र : आत्मनिर्भर भारत'' असल्यामुळे भारताच्या इतिहासापासून आधुनिक प्रगतीपर्यंतचा प्रवास रंगून दिसेल. पान २ वर

#### गणेशोत्सव : आत्मनिर्भरतेचे प्रतीक

भव्य पथसंचलनासाठी महाराष्ट्राचा चित्ररथ सज्ज झाला आहे. यंदा राज्याच्या वतीने गणेशोत्सव : आत्मनिर्भरतेचे प्रतीक या संकल्पनेवर आधारित चित्ररथ सादर केला जाणार आहे. लोकमान्य टिळकांनी सार्वजनिक गणेशोत्सवातून ज्या सामाजिक क्रांतीची मुहूर्तमेढ रोवली, तिच चळवळ आज आधुनिक भारताला कशी पान २ वर

## गुरुद्वारा जमीन प्रकरणात प्रशासनाला कोर्टाचा दणका

### 'शॉर्टकट कारभार'वर ताशेरे, दोन महिन्यांत अहवालाचे आदेश

वृत्तसंस्था। छत्रपती संभाजीनगर

नांदेड येथील गुरुद्वाराच्या जमिनीवरील कथित अतिक्रमणप्रकरणी ठोस कारवाई करण्यात अपयशी ठरल्याबद्दल मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने नांदेड जिल्हा प्रशासनावर तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. १२ डिसेंबर २०२५ रोजी स्पष्ट निर्देश देऊनही अपेक्षित कार्यवाही न झाल्याने न्यायालयाने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर कठोर शब्दांत टीका केली. न्यायमूर्ती विभा कानकणवाडी व न्यायमूर्ती हितेन वेणेगावकर यांच्या खंडपीठाने जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांना या प्रकरणात केलेल्या कारवाईचे स्पष्टीकरण देणारे प्रतिज्ञापत्र स्वतः सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

खंडपीठाने जिल्हाधिकाऱ्यांनी याआधी स्थापन केलेली समिती रद्द करत, महसूल अधिकाऱ्यांच्या वारंवार बैठका घेण्याच्या भूमिकेला 'शॉर्टकट दृष्टिकोन' असे संबोधले. न्यायालयाने स्पष्ट केले, की सरकारी जमिनीवरील कथित अतिक्रमणासारख्या गंभीर प्रकरणात केवळ बैठका घेऊन वेळ घालवणे हे प्रशासनाच्या निष्काळजीपणाचे द्योतक आहे. तहसीलदारांनी दाखल केलेल्या प्रतिज्ञापत्रानुसार, पान २ वर

# प्रजासत्ताक दिनी कर्तव्य पथावर ‘भारत गाथा’ चित्ररथामध्ये संगीताची जादू!

वृत्तसंस्था। नवी दिल्ली

माहिती व प्रसारण मंत्रालयने भारतीय सिनेमा आणि कथाकथनाच्या परंपरेचा गौरव करत प्रजासत्ताक दिनाच्या चित्ररथासाठी दोन दिग्गज सर्जनशील व्यक्तिमत्त्वांना एकत्र आणले आहे. ते म्हणजे चित्रपट दिग्दर्शक संजय लीला भन्साळी आणि नव्या पिढीतील आघाडीची गायिका श्रेया घोषाल.

माहिती व प्रसारण मंत्रालयच्या प्रजासत्ताक दिनाच्या परेडमधील चित्ररथासाठी संजय लीला भन्साळी यांनी ‘भारत गाथा’ ही संकल्पना साकारली आहे. हा एक ऐतिहासिक क्षण मानला जात आहे, कारण पहिल्यांदाच एखादा भारतीय चित्रपट दिग्दर्शक देशाच्या सर्वात मोठ्या औपचारिक समारंभात भारतीय सिनेमाचे प्रतिनिधित्व करणार आहे. या विशेष दृष्टीकोनाला अधिक प्रभावी रूप देण्यासाठी भन्साळी यांनी श्रेया घोषाल यांची निवड एका खास गीतासाठी केली आहे. हे गीत २६ जानेवारी रोजी कर्तव्य पथावर सादर होणाऱ्या टॅब्लोसह ऐकायला मिळणार आहे. ‘भारत गाथा’शी संबंधित माहिती व प्रसारण मंत्रालयाचा हा चित्ररथ भारताच्या कथाकथनाच्या समृद्ध परंपरेचे दर्शन घडवतो. संगीत, दृश्य, अभिनय आणि सिनेमाचा अनोखा संगम साधून आपल्या संस्कृतीचा अविभाज्य भाग बनले आहेत. आज भारतीय सिनेमा देशाच्या कथा जगासमोर मांडण्याचे एक सशक्त माध्यम ठरले आहे. त्यामुळेच या भव्य सांस्कृतिक प्रवासात सिनेमाला विशेष स्थान देण्यात आले आहे. या प्रकल्पाशी संबंधित एका जवळच्या सूत्रांच्या माहितीनुसार, संजय लीला भन्साळी यांनी संकल्पित केलेल्या ‘भारत गाथा’ या प्रजासत्ताक दिनाच्या चित्ररथासाठी श्रेया घोषाल यांनी एक विशेष गीत गायले आहे. भन्साळी यांच्या कथाकथनात संगीताला नेहमीच महत्त्वाचे स्थान असते आणि श्रेया यांच्यासोबतचे त्यांचे सहकार्य नेहमीच वेगळी भावनिक खोली निर्माण करते. याआधीही या जोडीने प्रेक्षकांच्या मनात घर करणारे अनेक क्षण दिले आहेत आणि यावेळी तोच संगीतमय जादू कर्तव्य पथावर प्रजासत्ताक दिनाच्या परेडमध्ये अनुभवायला मिळणार आहे. भारतीय सिनेमाकडे केवळ मनोरंजन म्हणून नाही, तर भारताच्या सभ्यतागत कथाकथनाच्या परंपरेचा विस्तार म्हणून याकडे पाहिले जाते. भारतीय सिनेमा ही एक अशी सांस्कृतिक ताकद जी आजही जागतिक पातळीवर देशाची ओळख ठरते. भन्साळी यांची सिनेमाई दृष्टी ‘भारत गाथा’ला आकार देत आहे, तर श्रेया घोषाल यांचा स्वर त्यात प्राण फुंकत आहे. माहिती व प्रसारण मंत्रालयाचा ‘भारत गाथा’ टॅब्लो भारतीय कथाकथनाच्या परंपरेला भावनिक श्रद्धांजली अर्पण करणारा ठरणार आहे. यंदाचा पथसंचलनाचा सोहळा जनभागीदारीवर आधारित आहे. संचलनानंतर २६ ते ३१ जानेवारी दरम्यान लाल किल्ल्यावर आयोजित होणाऱ्या भारत पर्वमध्ये देशवासीयांना सांस्कृतिक समृद्धीचा आनंद घेता येणार आहे.



### चित्ररथासाठी वंदे मातरम आणि आत्मनिर्भर भारताची थीम, अनेक राज्यांचा सहभाग होणार

यावर्षीच्या प्रजासत्ताक दिनाची परेड थीम खूप खास आहे, जी दोन मुख्य मंत्रांवर आधारित आहे. स्वातंत्र्याचा मंत्र - वंदे मातरम् आणि समृद्धीचा मंत्र - स्वावलंबी भारत अर्थात आत्मनिर्भर भारत. यावर्षी सर्व चित्ररथ या थीमभोवती त्यांची कला आणि संस्कृती प्रदर्शित करतील. प्रजासत्ताक दिनाच्या संचलनासाठी संरक्षण मंत्रालयाकडून चित्ररथ निवडली जातात. सांस्कृतिक मंत्रालय देखील चित्रांच्या निवडीमध्ये सहभागी होते. आणि दीर्घ प्रक्रियेनंतर, चित्रे परेडमध्ये सहभागी होण्यासाठी चित्ररथ निवडली जातात. परेडसाठी फ्लोट्सची निवड ही एक लांब प्रक्रिया आहे जी काही महिने आधीच सुरू होते. फ्लोट्स सांस्कृतिक आणि कलात्मक स्वरूपाचे असल्याने, संरक्षण मंत्रालय आणि संस्कृती मंत्रालय या प्रक्रियेचे समन्वय साधतात. प्रक्रियेच्या सुरुवातीला, संरक्षण मंत्रालय सर्व राज्ये, केंद्रशासित प्रदेश आणि सरकारी विभागांना त्यांचे स्केचेस किंवा डिझाइन एका व्यापक विषयावर पाठवण्यासाठी आमंत्रित करते.

## संक्षिप्त

### खंडणी प्रकरणात रवी पुजारीला अटक

**मुंबई :** प्रसिद्ध नृत्य दिग्दर्शक रेमो डिसूझाकडून ५० लाखांची खंडणी मागितल्याच्या आरोपावरुन पोलिसांनी गँगस्टर रवी पुजारीला बेड्या ठोकल्या आहेत. पुजारीने रेमो डिसूझा आणि त्याच्या पत्नीला वारंवार फोन करून धमकी दिल्याचा आरोप आहे. त्यानंतर मुंबई गुन्हे शाखेच्या खंडणी विरोधी पथकाने कारवाई पुजारीला अटक केली. न्यायालयाने त्याला २७ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. माहितीनुसार, पुजारीने २०१८ मध्ये रेमोकडे ५० लाखांची खंडणी मागितली होती. पाच वर्षांपूर्वी सेनेगलमधून हद्दपार झाल्यापासून आरोपी रवी पुजारी तुरूंगातच होता.

### भरत गोगावलेंच्या मुलाचे आत्मसमर्पण

**रायगड :** नगरपरिषद निवडणुकीवेळी झालेल्या मारहाण प्रकरणात आरोपी असलेले आणि गेल्या काही दिवसांपासून फरार असलेले मंत्री भरत गोगावले यांचे पुत्र विकास गोगावले यांनी शुक्रवारी महाड पोलिसांसमोर आत्मसमर्पण केले. विकास गोगावले आज सकाळी कोणालाही खबर लागून न देता महाड पोलीस ठाण्याच्या मागच्या दाराने आत गेले आणि पोलिसांना शरण गेले. न्यायालयाने विकास गोगावले यांना पोलिसांना शरण जाण्याचे आदेश दिले होते. दोन डिसेंबरपासून विकास गोगावले फरार होते. विकास गोगावले फरार झाल्यानंतर हायकोर्टाने नाराजी व्यक्त केली होती.

### आमदार पुतण्याचा तुरुंगात मृत्यू

**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेसचे आ. दौलत दरोडा यांचे पुतणे हरीश दरोडा यांना आदिवासी विकास महामंडळाच्या भात खरेदी घोटाळा प्रकरणात अटक करण्यात आली होती. कारागृहात असतानाच हरेश दरोडा यांना हृदयविकाराचा झटका आला. त्यांना ठाणे रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचार सुरू असतानाच त्यांचा मृत्यू झाला. शहापूर तालुक्यात खरीप व रब्बी हंगाम २०२२-२३ या आर्थिक वर्षात केंद्राच्या किमान आधारभूत किंमत योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या भात खरेदीत झालेल्या गैरव्यवहारात हरेश यांच्यावर आरोप होता.

### अवघ्या २४ तासांत चक्क दोन हॅट्ट्रिक

**दुबई :** अफगाणिस्तान आणि वेस्ट इंडिज यांच्यातील तीन सामन्यांची टी-२० मालिकेतील अखेरच्या सामन्यात आज एकाच सामन्यात दोघांनी हॅटट्रिक केली. वेस्ट इंडिजकडून वेगवान गोलंदाज शमर स्प्रिंगरने अगोदर हॅटट्रिक पूर्ण केली. त्याआधी २१ जानेवारी दुसऱ्या टी-२० सामन्यात अफगाणिस्तानचा मुजीब उर रहमान याने हॅटट्रिक घेतली. त्यानंतर शमर स्प्रिंगरने दुसऱ्याच दिवशी या पराक्रमाची पुनरावृत्ती केली. एकाच मालिकेत इतक्या कमी वेळात दोन हॅटट्रिक होणे ही टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील ऐतिहासिक घटना आहे.

## जन्मशताब्दी वर्षानिमित्त लोककल्याणकारी अभियान : एकनाथ शिंदे

# बाळासाहेब ठाकरे यांची स्वप्न पंतप्रधान नरेंद्र मोदींनी पूर्ण केली

वृत्तसंस्था। मुंबई

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आजपासून सुरु झालेल्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त राज्यात आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून विविध लोककल्याणकारी अभियान राबविण्यात येणार असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज केली. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीही बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त ट्विट करून संवेदना व्यक्त करत त्यांच्या विचारांना पुढे नेण्याचा संकल्प केल्याचे शिंदे यांनी नमूद केले.

मुंबई महापालिकेच्या वतीने ‘शासन आपल्या दारी’च्या धर्तीवर ‘बाळासाहेब ठाकरे आरोग्य आपल्या दारी’ अभियान राबविले जाणार असून, कॅशलेस उपचारांची तरतूद अधिक व्यापक केली जाणार असल्याची माहिती शिंदे यांनी दिली. महायुती आणि एनडीए म्हणून आम्ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनाखाली काम करत आहोत. एनडीएमध्ये आम्ही तिसऱ्या क्रमांकाचा पक्ष असून, एनडीए आम्हाला योग्य मान-सन्मान देते. बाळासाहेब ठाकरे म्हणजे दिलेला शब्द पाळणारा नेता होते आणि कलम ३७० हटवणे व राममंदिर उभारणी ही त्यांची स्वप्ने पंतप्रधान मोदींनी पूर्ण केली, असे ते म्हणाले. बाळासाहेब ठाकरे यांच्या नावाने गडकोट किल्ले स्वच्छता मोहीम राबविण्यात येणार असून, गडकोट प्लास्टिकमुक्त केले जातील. या मोहिमेंतर्गत पिण्याच्या स्वच्छ पाण्याची सोय करण्यात येणार असून, शिवभक्तांच्या स्वयंसेवी संस्थांना एक लाख रुपयांचे मानधन देण्यात येणार आहे. तसेच ‘बाळासाहेब ठाकरे नागरी लोककल्याण अभियान’ अंतर्गत राज्यातील २९ महापालिका आणि ३९४ नगरपालिकांमध्ये विविध उपक्रम राबविले जाणार आहेत. यासाठी प्रत्येक महापालिकेला तीन कोटी तर प्रत्येक नगरपालिकेला एक कोटी रुपयांचा निधी देण्यात येणार आहे. पालिका क्षेत्रातील उत्कृष्ट शाळांना प्रोत्साहन देण्यासाठी अनुक्रमे १० लाख, ७ लाख आणि ३ लाख रुपयांची बक्षिसे देण्यात येणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले.



### विकासाच्या मुद्यावर मनसेचा पाठिंबा

कल्याण-डोंबिवलीत भाजपा आणि शिवसेनेची युती आहे. आम्ही युतीत निवडणुका लढलो. तेथे मनसेने विकासाच्या मुद्द्यांवर आम्हाला पाठिंबा दिला. आम्ही मनसेचे स्वागत करतो. मनसे उमेदवारांच्या वॉर्डमधील समस्या आम्ही नक्की सोडवू. मनसेचा जो विकासाचा अजेंडा आहे, तो आम्ही पूर्ण करु, असे एकनाथ शिंदे यांनी सांगितले. यावेळी एकनाथ शिंदे यांनी राज ठाकरे यांच्या लवचिक राजकीय धोरणाचेही समर्थन केले.

# जनगणनेचे वेळापत्रक आणि प्रश्नावली जाहीर

## एक एप्रिल ते ३० सप्टेंबरची शासकीय अधिसूचना जारी

वृत्तसंस्था। नवी दिल्ली

देशातील बहुप्रतीक्षित जनगणने च्या पहिल्या टप्प्याची घोषणा करण्यात आली असून एक एप्रिलपासून या मोहिमेला अधिकृतरीत्या सुरुवात होणार आहे. या पहिल्या टप्प्यात घरयादी आणि गृहगणना केली जाणार असून, यासाठी सरकारने ३३ प्रश्नांची यादी अधिसूचित केली आहे. प्रत्येक राज्य आणि केंद्रशासित प्रदेशाला एक एप्रिल ते ३० सप्टेंबर या दरम्यान आपल्या सोयीनुसार ३० दिवसांचा कालावधी निवडून ही प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे.

या मोहिमेअंतर्गत नियुक्त केलेले प्रगणक घराघरात जाऊन घराची मालकी, घराचा वापर आणि घराच्या बांधकामासाठी वापरलेले साहित्य (छप्पर, मजला इ.) याबद्दल माहिती घेतील. तसेच कुटुंबातील व्यक्तींची संख्या, कुटुंब प्रमुखाचे नाव, लिंग आणि प्रमुखाची जात (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा इतर) याविषयीचे प्रश्न विचारले जातील. घरामध्ये पिण्याच्या पाण्याचा स्रोत काय आहे, विजेची व्यवस्था, सांडपाणी निचरा, शौचालयाची उपलब्धता आणि स्वयंपाकासाठी एलपीजी किंवा पीएनजी जोडणी आहे का, याचीही नोंद केली जाणार आहे. आधुनिक जीवनशैलीचा आढावा घेण्यासाठी यावेळी नागरिकांकडील इलेक्ट्रॉनिक साधनांचीही माहिती घेतली जाईल. यामध्ये रेडिओ, टेलिव्हिजन, इंटरनेट सुविधा, लॅपटॉप, संगणक, टेलिफोन आणि स्मार्टफोन यांचा समावेश आहे.

### पुढील वर्षी दुसरा टप्पा

विशेष म्हणजे, प्रत्यक्ष प्रगणक घरी येण्यापूर्वी १५ दिवस नागरिकांना स्व-गणना करण्याचा पर्यायही उपलब्ध करून देण्यात आला आहे. पहिल्या टप्प्यातील ही गृहगणना सप्टेंबरपर्यंत पूर्ण झाल्यानंतर, फेब्रुवारी २०२७ मध्ये प्रत्यक्ष लोकसंख्या गणनेचा दुसरा टप्पा राबवला जाणार आहे.

## वर्ल्डकप ठरल्यानुसारच होणार!

वृत्तसंस्था। मुंबई

संपूर्ण क्रिकेटविश्वाचे लक्ष लागलेल्या टी-२० विश्वचषकाच्या तयारीला सध्या वेग आला आहे. या दरम्यान बांगलादेशने विनाकारण काही दिवस वाया घालवले आणि अखेर हा देश विश्वचषकातून बाहेर पडण्याच्या मार्गावर आहे. आयसीसीकडून याबाबत लवकरच अधिकृत घोषणा होण्याची शक्यता आहे. याच पार्श्वभूमीवर विश्वचषकाचे वेळापत्रक बदलले जाण्याची चर्चा होती. मात्र, आयसीसीने हे वृत्त फेटाळून लावले आहे. म्हणजे, स्पर्धा वेळापत्रकाप्रमाणे सुरु होतील.

## जिल्हा परिषदेतही स्वीकृत सदस्य!; मुख्यमंत्री सकारात्मक : ना. बावनकुळे

वृत्तसंस्था। मुंबई

राज्यातील महापालिकामधील स्वीकृत सदस्यांची संख्या नुकतीच वाढवून १० करण्यात आली आहे. नगरपालिकेतही स्वीकृत सदस्यांची नियुक्ती केली जाते. याच धर्तीवर आता जिल्हा परिषद आणि पंचायत समितीमध्ये स्वीकृत सदस्य नेमणूक करण्याच्या हालचाली वाढल्या आहेत. दहा सदस्यांमागे जिल्हा परिषदेत एक स्वीकृत सदस्य नेमणूक करण्यात येणार आहे. तर पंचायत समितीमध्ये पाच सदस्यांमागे एक स्वीकृत सदस्य नियुक्त करण्यात येणार आहे. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी माध्यमांना आज ही माहिती दिली.

ग्रामविकास आणि जिल्हा परिषद, पंचायत समिती अधिनियमात सुधारणा करावी, अशी विनंती मी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांना केली होती. याबद्दल ग्रामविकास मंत्र्यांशीही चर्चा झाली आहे. महापालिका आणि नगरपालिकेप्रमाणेच जिल्हा परिषद आणि पंचायत समितीमध्येसुद्धा स्वीकृत सदस्य असावेत, ही माझी मागणी मुख्यमंत्र्यांनी सकारात्मकतेने घेतली आहे. लवकरच हा कायदा मंत्रिमंडळाकडे आणि सभागृहात येईल, अशी अपेक्षा आहे. ग्रामीण भागातील अनेक लोकप्रतिनिधी चांगले काम करत असतानाही आरक्षणामुळे राहून जातात. त्यामुळे त्यांनाही संधी द्यावी, असा प्रस्ताव मी दिला असून यावर सकारात्मक निर्णय होईल, अशी माहिती बावनकुळे यांनी दिली.

## पान एकवरून

**हिंद-दी-चादर सोहळ्यासाठी...**

असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. या ऐतिहासिक सोहळ्यात सहभागी होण्यासाठी कोणत्याही पासची आवश्यकता नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. कार्यक्रम दोन्ही दिवस सकाळी ८ ते रात्री १० वाजेपर्यंत सुरू राहणार आहे. कार्यक्रमस्थळी येण्यासाठी आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांसाठी जिल्हा प्रशासनाच्या वतीने मोफत वाहनसेवेची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच, भाविकांसाठी भव्य लंगरची व्यवस्था करण्यात आली असून देश-विदेशातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमस्थळी आरोग्य विभागामार्फत मोफत आरोग्य तपासणी शिबिरे देखील आयोजित करण्यात आली आहेत. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिलेल्या माहितीनुसार, ५२ एकरांच्या विशाल परिसरात गुरुद्वाराची भव्य प्रतिकृती साकारण्यात येत असून, याठिकाणी भव्य मंडप उभारण्यात आला आहे. भाविकांच्या सोयीसाठी साडेतीनशेहून अधिक स्टॉल्स, आरोग्य शिबीर, पिण्याचे पाणी, स्वच्छता, निवास आणि भोजन व्यवस्थेचे सुयोग्य नियोजन करण्यात आले आहे. वाहतूक व पार्किंग व्यवस्थापनावर विशेष भर देण्यात आला असून, भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी प्रशासन सज्ज आहे. देशभरातून सुमारे आठ ते १० लाख भाविक नांदेडमध्ये दाखल होण्याचा अंदाज असून, या सेवेसाठी स्वयंसेवी संस्था व सेवाभावी संघटनांनी पुढे यावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. स्टॉल्स किंवा सेवा देऊ इच्छिणाऱ्या संस्थांनी जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा, त्यांना आवश्यक जागा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. सुरक्षेच्या दृष्टीने पोलीस यंत्रणा, महापालिका, परिवहन विभाग, शाळा-महाविद्यालये यांच्यात समन्वय साधून व्यापक नियोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यातून येणाऱ्या भाविक वाहनांची नोंद, मार्गदर्शन, वाहनतळ व्यवस्था आणि जनजागृती मोहिमा राबविण्यात आल्या आहेत.

देशातील काश्मिरी पंडितांच्या धर्मस्वातंत्र्याच्या रक्षणासाठी श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांनी तत्कालीन सत्तेला आव्हान दिले. आग्रा येथे अटक झाल्यानंतर दिल्लीच्या चांदणी चौकात त्यांनी धर्मांतरास नकार देत बलिदान दिले. सत्य, सहिष्णुता आणि मानवतेसाठी दिलेले हे बलिदान इतिहासात अजरामर ठरले आणि त्यांना ‘हिंद-दी-चादर’ अशी गौरवशाली उपाधी मिळाली. या संघर्षात सिकलीगर, बंजारा, लबाना, मोह्याल, सिंधी आदी समाजांचे योगदान मोलाचे राहिले. भाई मतीदास, भाई सतीदास व भाई दयाल यांनी गुरुनिष्ठेसाठी शहिदी पत्करली. या परंपरेचा वारसा जपण्यासाठी महाराष्ट्र शासन व विविध सामाजिक-धार्मिक संघटनांच्या संयुक्त पुढाकारातून हा भव्य शहिदी समागम साकारत आहे. या निमित्ताने शाळा, महाविद्यालये व विद्यापीठांत वक्तृत्व स्पर्धा, गीतगायन, माहितीपट प्रदर्शनांद्वारे जनजागृती करण्यात येत आहे. ‘हिंद-दी-चादर’ श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांचे विचार, त्याग आणि मानवतेचा संदेश घराघरांत पोहोचवणारा हा ऐतिहासिक सोहळा नांदेडनगरीसाठी अभिमानाचा क्षण ठरणार आहे.

**कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभागी...**

अनेक मंत्री यांच्यासह देश विदेशातील लाखो भाविकांचे नांदेड नगरीमध्ये आगमन होणार आहे. जिल्ह्यातील सर्व समाज बांधवांनी या कार्यक्रमात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन केले. हिंद की चादर या ऐतिहासिक कार्यक्रमानिमित्त करण्यात आलेल्या सर्व सोयी सुविधांची पाहणी केल्यानंतर ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते. ते म्हणाले, की हिंद दी चादर या कार्यक्रमासाठी मोदी मैदान येथे भव्य मंडपाची उभारणी करण्यात आली असून गुरुद्वाराची प्रतिकृती साकारण्यात आली आहे. मुख्य मंडपात कीर्तन व संतांचे आशीर्वचन होणार आहे. तसेच आठ लंगरची व्यवस्था करण्यात आली असून येणाऱ्या लाखो भाविकांची कुठलीही गैरसोय होवू नये यासाठी याठिकाणी सर्व सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

प्रदर्शनी, रुग्णालय, पार्किंगची व्यवस्था, मोफत बससेवा, या ठिकाणी ५५० समाजसेवी संस्थांच्या वतीने स्टॉल्स लावण्यात येणार आहेत. श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांनी सर्व समाजाला मानवतावाद शिकवला. त्यापासून प्रेरणा घेण्यासाठी जिल्ह्यातील सर्व समाज बांधवांनी मोठ्या संख्येने या कार्यक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले. याप्रसंगी भाजपाचे महानगराध्यक्ष माजी आ. अमरनाथ राजुरकर, माजी महानगराध्यक्ष प्रवीण साले यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

**महाराष्ट्र सदन घोटाळ्यात...**

करण्यात आले होते. यामध्ये छगन भुजबळ यांच्यासह समीर भुजबळ, पंकज भुजबळ आणि इतर ५२ जणांचा समावेश होता. ईडीने आरोप केला होता, की छगन भुजबळ यांनी वेगवेगळ्या कंपन्यांच्या माध्यमातून सुमारे १३.५ कोटी रुपयांची लाच घेतली होती. या संपूर्ण प्रकरणाचा तपास करताना तपास यंत्रणांनी सुमारे २०००० पानांचे अवाढव्य आरोपपत्र दाखल केले होते आणि यामध्ये ६० साक्षीदारांच्या जबाबांचा समावेश होता.

महाराष्ट्रात २०१४ मध्ये सत्तांतर झाल्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाला या प्रकरणाच्या चौकशीची परवानगी दिली होती. त्यानंतर मार्च २०१६ मध्ये ईडीने छगन भुजबळ यांची १० तास कसून चौकशी केली आणि त्यांना अटक करण्यात आली. या प्रकरणामुळे भुजबळ यांना २०१६ ते २०१८ या काळात सुमारे दोन वर्षांचा तुरुंगवास सोसावा लागला होता. अखेर पुराव्यांच्या अभावी आणि तांत्रिक मुद्द्यांच्या आधारे न्यायालयाने त्यांना आता सर्व आरोपांतून मुक्त केले आहे.

**सीमरन बालांकडे...**

जवानांच्या तुकडीचे नेतृत्व करतील. राष्ट्रीय स्तरावरील या कार्यक्रमात ही तुकडी शिस्त, व्यावसायिकता आणि भारताच्या सुरक्षा दलांमधील महिलांच्या वाढत्या भूमिकेचे दर्शन घडवेल. जम्मू-काश्मीरमधील राजौरी जिल्ह्यातील नौशेरा येथील रहिवासी असलेल्या सीमरन बाला यांनी यूपीएससीच्या सहायक कमांडंट परीक्षेत यश मिळवून सीआरपीएफमध्ये प्रवेश केला. त्यांचा हा सहभाग जम्मू-काश्मीरसाठी अभिमानाचा क्षण मानला जात असून, देशसेवेसाठी सशस्त्र दलात जाण्याची आकांक्षा बाळगणाऱ्या तरुणींना प्रेरणा देणारा ठरत आहे. २०२३ मध्ये पहिल्याच प्रयत्नात यूपीएससी केंद्रीय सशस्त्र पोलीस दल परीक्षा उत्तीर्ण करून सीआरपीएफमध्ये प्रवेश केला. या परीक्षेत त्यांनी अखिल भारतीय स्तरावर ८२ वी रँक मिळवली होती.

**महापौर-उपमहापौर निवडणूक...**

आयुक्तांकडे असणार आहेत. निवड प्रक्रियेचा पहिला टप्पा म्हणून सर्व २९ महापालिकांमधील इच्छुक नगरसेवक २७ आणि २८ जानेवारी दरम्यान आपले उमेदवारी अर्ज महापालिका सचिवांकडे सादर करतील.. अर्ज छाननीनंतर ३० किंवा ३१ जानेवारी रोजी महापौर आणि उपमहापौर पदासाठी प्रत्यक्ष निवडणूक होईल. ही निवड प्रक्रिया नव निर्वाचित नगरसेवकांच्या पहिल्याच सर्वसाधारण सभेत पार पडणार आहे. या वृत्तानुसार, २४ आणि २५ जानेवारी रोजी विभागीय आयुक्त महापालिकेच्या प्रथम सभेची तारीख आणि पीठासन अधिकारी निश्चित करतील. २७ आणि २८ जानेवारी रोजी महापौर, उपमहापौर पदासाठी इच्छुक सदस्य उमेदवारी अर्ज महापालिका सचिवांना करतील. ३० किंवा ३१ जानेवारी रोजी महापौर व उपमहापौर पदासाठी नवनिर्वाचित सदस्यांची बैठक घेऊन महापौर व उपमहापौर निवडण्यात येऊ शकतात.

**सोलापूरमध्ये उबाठा...**

करण्यात येत आहे. या प्रकरणी उच्च अधिकाऱ्यांकडे दाद मागण्याची तयारी सुरू केली असून, आवश्यक असल्यास न्यायालयात जाण्याचाही इशारा दिला आहे. या निर्णयामुळे काही मतदारसंघात पक्षाला मोठा फटका बसण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

**गुरुद्वारा जमीन प्रकरणात...**

३० डिसेंबर २०२५ रोजी मूळ नोंदी तपासण्यासाठी बैठक झाली होती आणि १२ जानेवारी २०२६ रोजी प्राथमिक अहवाल सादर करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले. मात्र, तो अहवाल प्रतिज्ञापत्रासोबत जोडण्यात न आल्याने न्यायालयाने ही बाब अस्वीकार्य ठरवली. परिणामी, उच्च न्यायालयाने नांदेडच्या अतिरिक्त जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली, तहसीलदार व जिल्हा भूमी अभिलेख अधीक्षक सदस्य असलेली नवीन समिती नियुक्त केली आहे. या समितीला गुरुद्वारा बोर्ड व महसूल विभागाकडे उपलब्ध कागदपत्रांची सखोल छाननी करून दोन महिन्यांत अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. न्यायालयाने निरीक्षण नोंदवले, की आधीच्या आदेशानुसार प्रतिज्ञापत्र जिल्हाधिकाऱ्यांनी स्वतः दाखल करणे आवश्यक होते. हे काम तहसीलदारांकडे सोपवणे म्हणजे प्रशासनाचा उदासीन दृष्टिकोन असल्याचे खंडपीठाने स्पष्ट केले. तसेच, निजामकालीन मूळ नोंदी तेलंगणाच्या महसूल विभागाकडे असल्याचे सांगण्यात येत असताना, राज्य पुनर्रचना कायद्याच्या तरतुदी तपासण्याची गरजही न्यायालयाने अधोरेखित केली. इतकी दशके उलटूनही महाराष्ट्राकडे या जमिनींची कागदपत्रे नसणे ‘अत्यंत आश्चर्यकारक’ असल्याचे न्यायालयाने नमूद केले. याचिकाकर्ते नांदेड गुरुद्वारा बोर्डाचे प्रतिनिधी मनजितसिंग जगनसिंग यांनी मोठ्या प्रमाणात कागदपत्रे सादर केली असून, गुरुद्वारा जमीन मालकीचा नव्हे तर पट्टेदार हक्काचा दावा करत असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आले. असे असूनही, प्रशासनाने महाराष्ट्र जमीन महसूल संहितेनुसार ठोस पावले न उचलल्याबद्दल खंडपीठाने तीव्र शब्दांत नाराजी व्यक्त केली. मूळ नोंदी आवश्यक असल्यास १५ दिवसांत तेलंगणा सरकारशी संपर्क साधण्याचे आणि १० मार्च २०२६ पूर्वी कोणतीही मुदतवाढ न देता प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश देत, उच्च न्यायालयाने आता कोणताही विलंब सहन केला जाणार नसल्याचा इशारा दिला.

**वंदे मातरम्ची दीडशे वर्षे आणि...**

आहे. शिवाय महाराष्ट्राचे सांस्कृतिक वैभव असलेल्या गणेशोत्सवाचा चित्ररथ संबंध देशाचे आकर्षण ठरणार आहे. यंदाच्या प्रजासत्ताक दिनाची संकल्पना भारताची एकता, विविधता आणि प्रगती या त्रिसूत्रीवर आधारित आहे. स्वातंत्र्याच्या अमृत काळानंतर विकसित भारताकडे पडणाऱ्या पावलांचे प्रतिबिंब कर्तव्य पथावरील चित्ररथांमध्ये पाहायला मिळणार आहे. वंदे मातरम्च्या दीडशे वर्षांच्या गौरवशाली प्रवासाचे स्मरण करत देशाच्या बलिदानाचा आणि क्रांतीचा इतिहास पुन्हा एकदा जिवंत केला जाणार आहे. प्रजासत्ताक दिनाच्या परेडमध्ये तिन्ही सैन्य दलांचे संचलन, चित्तथरारक कसरती आणि विविध राज्यांच्या संस्कृतीचे दर्शन घडवणारे चित्ररथ हे आकर्षणाचे केंद्र असतील. भारताने तंत्रज्ञान आणि संरक्षण क्षेत्रात केलेल्या प्रगतीचे दर्शन या माध्यमातून जगाला घडवले जाणार आहे. संपूर्ण दिल्लीत सध्या कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली असून, २६ जानेवारीच्या या दिमाखदार सोहळ्याकडे जगाचे लक्ष लागले आहे.

या सोहळ्यासाठी भारताने आंतरराष्ट्रीय स्तरावर मैत्रीचा नवा हात पुढे केला आहे. प्रजासत्ताक दिनाचे मुख्य अतिथी म्हणून युरोपियन युनियनचे दोन शक्तिशाली नेते उपस्थित राहणार आहेत. युरोपियन कौन्सिलचे अध्यक्ष एंटोनियो कोस्टा आणि युरोपियन कमिशनच्या अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेयेन यांच्या उपस्थितीत यंदाचा सोहळा रंगणार आहे. प्रजासत्ताक दिन परेड सकाळी ९:३० वाजता राष्ट्रपतींच्या हस्ते ध्वजवंदन होईल. ध्वजवंदनानंतर वंदे मातरम् गीताला १५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त विशेष मानवंदना दिली जाईल. त्यानंतर १०.३० वाजता कर्तव्य पथावर मुख्य परेड सुरु होईल जी जवळपास दीड ते दोन तास चालेल.

**२,५०० कलाकारांचा...**

एकता सिद्ध करणारा एक अविस्मरणीय सोहळा ठरणार आहे. पारंपरिक लोकनृत्य आणि संगीताच्या माध्यमातून भारताची संस्कृती एकाच रांगेत जगासमोर सादर केली जाईल.

**भव्य परेड आणि विविध...**

ऑपरेशन सिंदूर थीमवर आधारित चित्ररथ यंदा विशेष आकर्षण ठरेल, ज्यात भारतीय सैन्याचे सामर्थ्य, राफेल आणि अन्य लढाऊ विमानांचे प्रतिनिधीत्व झळकताना दिसेल. विविध राज्यांचे चित्ररथ त्यांच्या सांस्कृतिक वारसा, आर्थिक उत्कर्ष, पर्यटन व नवोन्मेष यांचे सान्निध्य दाखवतील.

**गणेशोत्सव : आत्मनिर्भरतेचे...**

आत्मनिर्भर बनवत आहे, याचे चित्रण चित्ररथात करण्यात आले आहे. गणेशोत्सवाच्या माध्यमातून होणारी कोट्यवधींची आर्थिक उलाढाल, मूर्तिकार आणि सजावट कलाकारांना मिळणारा रोजगार आणि त्यातून विणली गेलेली आर्थिक साखळी या चित्ररथाच्या केंद्रस्थानी आहे.

## माळ्याचा गणपती ग्रामस्थांचे बनले श्रद्धास्थान

# बारडमध्ये भाविकांसाठी भाजी भाकरीचा महाप्रसाद

प्रतिनिधी । **मुदखेड**

मुदखेड तालुक्यातील बारड येथील माळ्याच्या मळ्यातील गणपती ग्रामस्थांचे श्रद्धा स्थान बनले असून गणेश जन्मोत्सवानिमित्त भाविकांसाठी भाजी भाकरीचा महाप्रसाद वाटप करण्यात आला असून ओम ग गणपतये नमः च्या मंत्रात भाविकांनी मनोभावे महापूजा केली .

गावालगत माळ्याच्या मळ्यात पुरातन काळातील श्री गणेश मंदिर आहे . या मंदिराचा ग्रामस्थांच्या पुढाकारातून जिरनो उद्धार करण्यात आला आहे. दर चतुर्थीला पंच क्रोषीतील भक्तगण मोठ्या भक्ती भावे दर्शनासाठी येत असतात . या मंदिराची देखभाल कोरबनवाड परिवार यांच्याकडे आहे . निसर्गरम्य परिसरात भव्य मंदिर उभारण्यात आले आहे . विघ्नहर्ता संस्थेच्या वतीने दर चतुर्थीला भक्तांसाठी महाप्रसाद ठेवला जातो .



यानिमित्त भजनी मंडळ महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते . या कार्यक्रमात वारकरी संप्रदायातील भक्तगण सहभागी झाले होते .

श्री गणेश मंदिरात विघ्नहर्ता संस्थेचे विश्वस्त गंगाधर कोरबनवाड यांच्या हस्ते दूध अभिषेक सामूहिक महापूजा करण्यात आली . या पूजेत कचरू कोरबनवाड, मारुती कोरबनवाड , रामेश्वर कोरबनवाड, मधुकर कोरबनवाड , पुंडलिक कोरबनवाड, सिताराम कोरबनवाड, यांच्या सहकुटुंब परिवाराने मनोभावी पूजा केली . श्री विघ्नहर्ता मंदिराची कोरबनवाड परिवाराने साफसफाई करून फुलांची सजावट केली होती . यावेळी श्री गणेशाचा नामजप करण्यात आला . पंचक्रोषितील गणेश भक्तांसाठी भाजी भाकरीचा महाप्रसाद ठेवण्यात आला असून मोठ्या संख्येत भक्तांनी लाभ घेतले. गणेश महोत्सवासाठी सुरेश देशमुख , संजय मालीपाटील , संदीप कोरबनवाड , मुकुंद कोरबनवाड, विलास कोरबनवाड, ज्ञानेश्वर कोरबनवाड , सुनील कोरबनवाड, सखाराम कोरबनवाड, राहुल कोरबनवाड,परमेश्वर कोरबनवाड, दिलीप कोरबनवाड, अनिल कोरबनवाड, अंकुश कोरबनवाड, संतोष कोरबनवाड, साहिल कोरबनवाड, बाळू कोरबनवाड, दत्ता कोरबनवाड , यांच्यासह ग्रामस्थांनी पुढाकार घेतला होता .

### ग्रामस्थांच्या पुढाकारातून कार्यक्रम

गावालगत माळ्याच्या मळ्यात पुरातन काळातील श्री गणेश मंदिर आहे. या मंदिराचा ग्रामस्थांच्या पुढाकारातून जिरनो उद्धार करण्यात आला आहे. दर चतुर्थीला पंच क्रोषीतील भक्तगण मोठ्या भक्ती भावे दर्शनासाठी येत असतात . या मंदिराची देखभाल कोरबनवाड परिवार यांच्याकडे आहे. निसर्गरम्य परिसरात भव्य मंदिर उभारण्यात आले आहे . विघ्नहर्ता संस्थेच्या वतीने दर चतुर्थीला भक्तांसाठी महाप्रसाद ठेवला जातो .



# मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त बोली भाषेचा झाला जागर

प्रतिनिधी । **नांदेड**



महाराष्ट्र शासनाच्या मराठी भाषा विभाग भाषा संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या वतीने मराठी भाषा संवर्धन पंधरवडा निमित्त बोलींचा जागर हा कार्यक्रम दिनांक २१ जानेवारी रोजी सरस्वती विद्यामंदिर कला महाविद्यालय किनवट येथे घेण्यात आला.

कार्यक्रमाचे उद्घाटन सरस्वती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष व्यंकटराव नेमानेवार यांच्या हस्ते झाले भाषा अभ्यासक प्राचार्य डॉ. आनंद भंडारे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे मराठी विभाग प्रमुख व भाषा संचालनालयाचे सल्लागार व भाषेचे अभ्यासक प्रोफेसर डॉ. पृथ्वीराज तौर, कोलामी बोलीचे अभ्यासक प्रज्ञा प्रतिष्ठान अध्यापक महाविद्यालय नांदेडचे प्राचार्य डॉ. राजू मोतेराव यांनी बोलीचे वैशिष्ट्य व काळानुसार लोकपाबत चालत असलेल्या बोलीं यांची कारण मीमांसा, समस्या व उपाययोजना याबाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले.

प्राचार्य भंडारे यांनी अध्यक्षीय समारोप करताना युवा पिढीची आणि समाजाची बोली संवर्धनासाठी आवश्यक असलेली भूमिका विशद करत आपल्या परिसरातल्या बोली संवर्धनाच्या कामासाठी युवकांनी अभ्यासकांनी पुढे यावे असे आवाहन केले. संस्थेचे सचिव मुख्याध्यापक कृष्णकुमार नेमानीवार महाराष्ट्र शासनाच्या भाषा विभागाचे भारत जाधव सुधाकर महाजन व राहुल सूर्यवंशी, सरस्वती कॉलेज ऑफ एज्युकेशनचे प्राचार्य डॉ. किरण पाईकराव, संत भगवान बाबा कला व विज्ञान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.आनंद भालेराव उच्च माध्यमिक विद्यालयाचे सुपरवायझर प्रा. रेणुकादास पहूरकर,भारत हातमोडे, होमदेव दडांजे,गणपत मडावी, दत्ता वेट्टी,वरद नेम्मानीवार यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती

मराठी विभाग प्रमुख व महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाचे सदस्य डॉ. मार्तंड कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले भाषा विभागाचे भारत जाधव यांनी शासनाची या कार्यक्रमाची भूमिका विशद केली. डॉ. सुनील व्यवहारे यांनी सूत्रसंचालन केले डॉ किरण आईनेनीवार यांनी आभार व्यक्त केले.

गुणवत्ता विभाग प्रमुख डॉ. द्वारकाप्रसाद वायाळ, डॉ. रामकिशन चाटे,प्रा.विवेक चनमनवार,डॉ. मनोहर थोरात, डॉ.अजय किटे,प्रा बाळू भंडारे, प्रा. अनिल मुंडे यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमात किनवट व माहूर परिसरातील विविध बोलींचे संकलन व संवर्धन करण्यासाठी सरस्वती महाविद्यालयात राबविण्यात येणाऱ्या बोली संवर्धन प्रकल्पाची माहिती माहिती उपस्थित त्यांना देण्यात आली, राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा समारोप झाला.

## संक्षिप्त

### सुभाषचंद्र बोस जयंती साजरी

**नांदेड :** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीतील स्वागत कक्षामध्ये शुक्रवार, दि.२३ जानेवारी, रोजी नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव तथा अधिष्ठाता डॉ. एम. के. पाटील यांच्या हस्ते नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

### रमाई जयंती कार्यकारणी गठित

**नांदेड:** दक्षिण मतदार संघातील लोहा तालुक्यात येत असलेल्या जवळा दे येथील विश्वशांती बुद्ध विहार या ठिकाणी दरवर्षीप्रमाणे त्याग मूर्ती माता रमाई जयंती महोत्सवाची कार्यकारणी गठीत करण्यात आली. व यावेळी सर्व उपासक-उपासिकांच्या उपस्थितीत सकाळी ध्वजारोहण त्यापूर्वी विविध स्पर्धा प्रमुख व्याख्यात्यांचे मार्गदर्शन दुपारी भव्य देखाव्यासह गावातील प्रमुख मार्गाने मिरवणूक आणि त्यानंतर सायंकाळी रुचकर भोजनदान यासह आदी कार्यक्रमांचा आराखडा नियोजन बैठकीत मंजूर करण्यात आला.

### रिक्त पदे भरण्याचा प्रशासनास इशारा

**नांदेड :** बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर येथील जि.प.वरिष्ठ प्राथमिक शाळेत दोन शिक्षकांची पदे रिक्त असून बदली कार्यक्रम संपून काही महिने लोटले तरी येथील दोन जागा भरण्याची कार्यवाही शिक्षण प्रशासनास अजूनही करता आलेली नसल्यामुळे येथील गंगाधर विठ्ठल पंगलवार यांनी निवेदन दिले आहे.

# घरकुल व मनरेगाच्या प्रलंबित देयकासाठी आंदोलन

प्रतिनिधी । **किनवट**



पंतप्रधान आवास योजना ग्रामीण अंतर्गत असंख्य घरकुल लाभार्थींचें प्रलंबित देयके आद्याप मिळाली नाहीत, त्याच सोबत गेली अनेक दिवस मनरेगा अंतर्गत व्यक्तीक व सार्वजनिक कामांची मजुरांची मस्टर पेमेंट राखडली आहेत. किनवट तालुका दुष्कळाच्या अनुषंगाने तातडीने मोठ्या प्रमाणात सार्वजनिक कामे काढून मजूर व शेतकऱ्यांनाच्या हाताला काम देण्याच्या प्रमुख मागण्यासाठी मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या वतीने पंचायत समिती कार्यालयावर बेमुदत घेराव आंदोलन करत असल्याची माहिती माकप नेते कॉ. अर्जुन आडे यांनी दिले आहे.

आंदोलनाच्या अनुषंगाने माकप गाव पातळीवर मजूर व घरकुलाभार्थ्यांना संघटित करत असून आंदोलनाच्या बाबत गाव पातळीवर जनजागृती मोहीम माकप ने सुरू केली आहे.

सर्व मंजूर घरकुल लाभार्थ्यांचे सरसकट प्रलंबित देयके विना विलंब अदा करा, केंद्र व राज्य सरकारने आवास योजने करिता दोन लक्ष दहा हजार याप्रमाणे सर्व घरकुल लाभार्थ्यांना अनुदान लागू करा,आगामी काळात घरकुल अनुदान रक्कम पाच लक्ष पर्यंत वाढवा, मनरेगा अंतर्गत सुरू असलेल्या व्यक्तिगत व सार्वजनिक कामांची कुशल व अकुशल देयके मस्टर पेमेंट त्वरित अदा करा, बंद असलेली सार्वजनिक, वैयक्तिक लाभाची कामे चालू करून मजुरांच्या हाती काम द्या, दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील आणेवारी ३६ टक्के च्या खाली असल्यामुळे मजुरांना व शेतकऱ्यांना कामे मिळण्याकरिता मोठ्या प्रमाणात सार्वजनिक कामे सुरू करा, पूर्वीची मनरेगा योजना सुरू ठेवून ती अधिक सक्षम करा, तालुक्यातील ग्रामीण भागातील सरकारी नकाशावरील सर्व पानदान रस्त्यांचे काम तातडीने सुरू करा.आंदोलनात घरकुल लाभार्थी मजूर बांधव व शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन जनार्दन काळे, शैलीया आडे, इरफान पठाण, खंडेराव कानडे, शेषराव ढोले, आडेलू बोनगीर, सिताराम आडे, तानाजी राठोड, राम कनडेल, मोहन जाधव, विजय जाधव, मनोज सल्लावार,सुदाम बर्गे, शिवाजी किरवले, साईनाथ राठोड, प्रशांत जाधव, रंगराव चव्हाण, सुनिता बोनगीर, इंदल राठोड, फरीद बाबा, नंदू मोडूकवार आदींनी केले आहे.

# बजाजनगर येथे नवनिर्वाचित नगरसेवकांचाआज सत्कार

प्रतिनिधी ।**नांदेड**

नांदेड वाघाळा महानगर पालिका नांदेडच्या नुकत्याच झालेल्या निवडणुकीत प्रभाग क्रमांक ६ मध्ये निवडून आलेले सौ.शीला किशोर भवरे, राजेश यन्नम, सौ. वैशाली मिलिंद देशमुख, आशिष धुंडीराज नेरलकर (ड) आदि उमेदवार भारतीय जनता पार्टीच्या वतीने भरघोस मतांनी निवडून आले आहेत.

या सर्वांचा सत्कार प्रभाग क्रमांक (६) च्या नागरिकांच्या वतीने आणि श्री हनुमान मंदिर प्रतिष्ठान व श्री दत्त मंदिर प्रतिष्ठान बजाज नगरच्या वतीने दिनांक २४ जानेवारी शनिवार सायंकाळी ७.३० वाजता श्री हनुमान मंदिर प्रतिष्ठान बजाजनगर, नांदेडच्या प्रांगणात सत्कार होणार आहे.

जास्तीत जास्त संख्येने या कार्यक्रमास नागरिकांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी असे आवाहन दोन्हीही प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे.

# हिंदूहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांची जयंती साजरी

प्रतिनिधी । **कंधार**



हिंदू हृदय सम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांची जनशताब्दी वर्ष (१०० वी जयंती) छत्रपती शिवाजी महाराज चौक कंधार येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास पुष्पहार घालून व शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून शिवसेना कंधार तालुक्याच्या वतीने मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली.

शिवसेना पक्षप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी निमित्त कंधार येथे कंधार तालुका (उबाठा) शिवसेनेच्या वतीने एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शिवसेना नेते प्रा.डॉ. पुरुषोत्तम धोंडगे, राष्ट्रवादीचे नेते ॲड.मुक्तेश्वर धोंडगे, नगरध्यक्ष शाहजी नळगे , तालुकाप्रमुख परमेश्वर पाटील जाधव, माजी नगरसेवक गणेशभाऊ कुंटेवार ,दादाराव पाटील शिंदे,जी एम पवळे , पांडुरंग मामडे ,माधव भालेराव , विश्वनाथ पवार ,पंडित देवकांबळे , ,संतोष घोरबांड, मनोहार पेटकर,व्यंकटी सोनटक्के, रोहिदास शिराढोणे ,लक्ष्मण कटवाड , आत्माराम लाडेकर, राजीव डफडे, सदाशिव पटणे , चेंपतराव शिराळे, वसंत नीलावाड,माधव लुंगारे लक्ष्मण गायकवाड, नामदेव बोरुळे इ. सह जेष्ठ शिवसैनिक , पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# श्रीमती नरसाबाई माता दिव्यांग विद्यालयाचे क्रीडा स्पर्धेत यश

प्रतिनिधी । **बाऱ्हाळी**



संधी निकेतन शिक्षण संस्था वडगाव द्वारा संचलित श्रीमती नरसाबाई माता दिव्यांग विद्यालय वडगाव येथील विद्यार्थ्यांनी क्रीडा स्पर्धेत बाजी लावून जिल्ह्यात अस्थिव्यंग प्रवर्गात प्रथम पटकाविला आहे.

जागतिक दिव्यांग दिनानिमित्त जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण विभाग जिल्हा परिषद नांदेड यांच्या वतीने दि. १९ जानेवारी रोजी नांदेड येथे दिव्यांग मुला-मुलींचे जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा घेण्यात आल्या. या क्रीडा स्पर्धेमध्ये नांदेड जिल्ह्यातील विविध प्रवर्गातील ७५ शाळांनी सहभाग घेतला होता. त्यामध्ये अस्थिव्यंग प्रवर्गामध्ये श्रीमती नरसाबाई माता निवासी दिव्यांग विद्यालय वडगाव ता . मुखेड येथील १० विद्यार्थ्यांनी क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत सहभाग घेतला होता. शाळेतील स्पर्धक विद्यार्थ्यांनी आपले कौशल्य दाखवून उल्लेखनीय कामगिरी करत ५ सुवर्ण व २ सिल्वर एकूण सात पदके जिंकून संस्थेची शान राखली आहे. विशेष म्हणजे नांदेड जिल्ह्यातील अस्थिव्यंग प्रवर्गामध्ये एकाच शाळेने सर्वाधिक सुवर्णपदके मिळवण्याचा बहुमान सदरील विद्यालयाने कमावला आहे . या उतुंग यशाबद्दल जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी अवधूत गंजेवार, जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण विभागाचे सल्लागार दिनकर नाटे यांच्या हस्ते शाळेला प्रथम पारितोषिक देऊन सन्मानित करून शाळेच्या विशेष कामगिरीबद्दल कौतुक करण्यात आले. तसेच स्पर्धेमध्ये ५ सुवर्णपदके मिळवलेल्या विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड करण्यात आली आहे. त्यांच्या या यशाबद्दल विद्या विकास शिक्षण संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती विजयाताई देशपांडे, नि.म. वडगावकर गुरुजी, सचिव रमेश वडगावकर, सौ. गजराबाई वडगावकर यांनी विद्यार्थी व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

# अशोक माध्यमिक विद्यालयाचे माजी एनसीसी कॅडेट रोहित जाधव यांची जीसीसीपीमध्ये निवड

प्रतिनिधी । **किनवट**



मांडवी शिक्षण प्रसारक मंडळ द्वारा संचलित अशोक माध्यमिक विद्यालय पळशी ता. किनवट येथील राष्ट्रीय छात्र सेनेचा कॅडेट माजी विद्यार्थी रोहित अशोक जाधव लालुनाईक तांडा यांची केंद्रीय रिजर्व पुलीस बल, पुणे अंतर्गत (जीसीसीपी), गृह मत्रालय, भारत सरकारमध्ये निवड झाली आहे.

या निवडीबद्दल शाळेचे मुख्याध्यापक रमेश राऊलवार, केंद्रप्रमुख कांबळे, डी.डी. संदुलवार, मुख्याध्यापक किशोर पवार, मुख्याध्यापक राजु चौधरी, एनसीसी प्रमुख एस. डी. राठोड यांनी रोहित जाधव यांचा यथोचित सत्कार करून भविष्यकालीन सेवा व योगदानासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. राष्ट्रीय छात्र सेनेचा कॅडेट माजी विद्यार्थी रोहित यांनी यश संपादन केल्या बद्दल एम. एस.पी. एम. चे अध्यक्ष नवीन राठोड, सचिव, सौ.जयश्री राठोड, उपाध्यक्ष डॉ. सुशील राठोड तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी आदींनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.

### ढगाळ वातावरण

नांदेड:शहरात गेल्या दोन दिवसांपासून ढगाळ वातावरण आहे.ढगाळ वातावरणामुळे थंडीचा प्रभाव कमी जाणवत आहे.

**CHANGE IN NAME**

MY OLD NAME IS PAWAR SATISH ANKUSH
Which now I am. Changing as New Name:
SATISH ANKUSHRAO PAWAR Hence, forth my all correspondence. Will be done as per my New Name. Please consider, the same.
**:: Address ::**
slo Ankushrao Pawar
H.NO: 1-18-116, Behind Ambika
MangalKaryalay Sant Dnyaneshwar Nagar
Nanded, Maharashtra - 431605
Mob.9834706241

**CHANGE IN NAME**

MY OLD NAME IS FARZANA BEGUM.
Which now I am. Changing as New Name:
FARZANA Khanam wahed Khan. Hence, forth my all correspondence. Will be done as per my New Name. Please consider, the same.
**:: Address ::**
**28-179 Millgate**
**Near Khan Estati Nanded.**
**Mob. 9923174589.**

**संमेलन** २६ ते २८ जानेवारी कालावधीत होणार

# 'गुराखीगड येथे जागतिक गुराखी साहित्य संमेलन

प्रतिनिधी । **लोहा**

गुराखी समाजातील उपेक्षित कलावंतांना व्यासपीठ मिळावे, त्यांची संस्कृती, परंपरा आणि साहित्यिक योगदान यांचा गौरव व्हावा या उद्देशाने ३१ वे जागतिक गुराखी साहित्य संमेलन मोठ्या उत्साहात साजरे होणार आहे. हे संमेलन गुराखीगड, नांदेड येथे दि. २६ ते २८ जानेवारी २०२६ या कालावधीत आयोजित करण्यात आले असून, श्री शिवाजी मोफत एज्युकेशन सोसायटी, कंधार, श्री शिवाजी ग्रामीण विद्यापीठ, कंधार, आणि हम सब एक है गुराखी पीठ, कंधार यांच्या संयुक्त विद्यमाने होणार आहे.

या संमेलनाची संकल्पना श्री शिवाजी मोफत एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक, माजी खासदार व आमदार, आणि गुराखी संमेलनाचे संकल्पक डॉ. केशवराव धोंडगे यांच्या दूरदृष्टीतून साकार झाली आहे. संमेलनाचे आयोजन संस्थेचे अध्यक्ष व गडपती प्रा. डॉ. पुरुषोत्तम केशवराव धोंडगे यांच्या नेतृत्वात होत असून, संस्थेचे सचिव माजी आ. व ज्येष्ठ स्वातंत्र्य सेनानी भाई गुरुनाथराव कुरुडे, तसेच सहसचिव ॲड. मुक्तेश्वरराव धोंडगे यांच्या मार्गदर्शनाखाली हा सांस्कृतिक सोहळा पार पडणार आहे.

या तीन दिवसीय संमेलनाचे उद्घाटन पोहरादेवी संस्थानचे महंत परमपूज्य बाबूसिंह महाराज यांच्या हस्ते होणार असून, संमेलनाध्यक्ष म्हणून माजी आ. गोविंद अण्णा केंद्रे हे कार्यभार सांभाळणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे नातू व अण्णाभाऊ साठे क्रांती सेना प्रमुख श्री. सचिन साठे, सुप्रसिद्ध ग्रामीण साहित्यिक प्रा. इंद्रजीत भालेराव, तसेच लोकशाहीर दामोदर अण्णा वजीरगावकर उपस्थित राहून गुराखी साहित्याच्या परंपरेला उजाळा देणार आहेत. संमेलनात २६ जानेवारी रोजी उद्घाटन समारंभ, २७ जानेवारी रोजी विविध कलागुणदर्शन व सांस्कृतिक कार्यक्रम, तर २८ जानेवारी रोजी खुले अधिवेशन, समारोप व गुराखी काल्याचे वाटप अशा समृद्ध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी गुराखी समाजातील विविध कलावंत, साहित्यिक आणि सामाजिक कार्यकर्ते सहभागी होऊन आपले कलागुण सादर करणार आहेत.संमेलनात सहभागी होण्यासाठी आणि गुराखी संस्कृतीचा उत्सव साजरा करण्यासाठी परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती चंद्रप्रभावती माय केशवराव धोंडगे, गडपती प्रा. डॉ. पुरुषोत्तम धोंडगे, भाई गुरुनाथराव कुरुडे, ॲड. मुक्तेश्वरराव धोंडगे, तसेच संस्थेचे सर्व पदाधिकारी यांनी केले आहे.

### साहित्यिक प्रा. इंद्रजीत भालेराव येणार

तीन दिवसीय संमेलनाचे उद्घाटन पोहरादेवी संस्थानचे महंत परमपूज्य बाबूसिंह महाराज यांच्या हस्ते होणार असून, संमेलनाध्यक्ष म्हणून माजी आ. गोविंद अण्णा केंद्रे हे कार्यभार सांभाळणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे नातू व अण्णाभाऊ साठे क्रांती सेना प्रमुख सचिन साठे, सुप्रसिद्ध ग्रामीण साहित्यिक प्रा. इंद्रजीत भालेराव, तसेच लोकशाहीर दामोदर अण्णा वजीरगावकर उपस्थित राहून गुराखी साहित्याच्या परंपरेला उजाळा देणार आहेत.

**जाहीर समन्स**

कार्यालय
न्यायाधीश सहकार न्यायालय, नांदेड
''देवाशिष एसबीआय मुख्य शाखा समोर,
डॉ. लेन, नादेड ४३१६०१.

**नांदेड येथील मे. न्यायाधीश, सहकार न्यायालय, नांदेड यांचे न्यायालयात**
**वादी :–** डॉ. बाबासाहेब आंबेडकर अर्बन को-ऑप क्रेडीट सोसायटी लि.जि.नांदेड मार्फत सहायक व्यवस्थापक
**विरूध्द**
**प्रतीवादी :–** अशोक विठठलराव संगपवाड, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सोनारी, भोकर, ता.भोकर,जि.नांदेड.

| अ. क्र. | सहकार केस नं. | प्रतीवादीचे नाव व पत्ता | दावा रक्कम रुपये | नेमलेली तारीख |
|---|---|---|---|---|
| १. | सी.सी.एन./२९०/२०२५ | १.अशोक विठ्ठलराव संगपवाड , रा. जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सोनारी,भोकर,ता.भोकर,जि.नांदेड | रु.६,२२,९३२/– | दि.०७,/०२/२०२६ |

ज्याअर्थी, वादी यांनी आपले विरूध्द या न्यायालयात दावा दाखल केलेला आहे. त्यामुळे या जाहीर समन्स / नोटीसव्दारे आपणास असे सूचित करण्यात येते की, आपण व्यक्तीशः अथवा योग्यरितीने अधिकार प्रदान करण्यात आलेला अधिकृत प्रतिनिधी, जो या दाव्याच्या संदर्भातील सर्व महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे देवू शकेल अशा अधिकृत प्रतिनिधीमार्फत या न्यायालयामध्ये दि. ०७/०२/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता आपल्या विरूध्द करण्यात आलेल्या दाव्याच्या संदर्भात आपले म्हणणे मांडण्यासाठी व पुरावे दाखल करण्यासाठी हजर राहावे.

उपरोक्त उल्लेखित तारखेस वेळेवर हजर न राहिल्यास सदरील दाव्याचा निकाल आपले गैरहजेरीमध्ये करण्यात येईल, याची नोंद घ्यावी. सदर जाहीर समन्स हे मा. न्यायाधीश यांच्या दिनांक. १४/०१/२०२६ रोजीच्या हुकूमान्वये दिले आहे.

स्वाक्षरित/-
**न्यायालयीन लिपीक,**
**सहकार न्यायालय, नांदेड.**

# भारतीय अर्थव्यवस्थेची झेप !

**भारतीय** अर्थव्यवस्थेच्या वाढीबद्दलचा एक नवा अंदाज आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने जाहीर करुन तो ७.३ टक्क्यांनी वाढवला आहे. चालू आर्थिक वर्षाच्या शेवटच्या तिमाहीत सर्व क्षेत्रातील कामगिरी मजबूत होत असल्याने यंदा आर्थिक वाढीचा दर ७.३ टक्के राहील असे नाणेनिधीने आपल्या अहवालात नमूद केले आहे. पुढच्या आर्थिक वर्षात २०२६-२७ मधे भारताच्या आर्थिक वाढीचा दर ६.४ टक्के राहील तसेच सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था भारताची असेल, असा अंदाज नाणेनिधीने गेल्या आठवड्यात जाहीर केलेल्या अहवालात दिला आहे. अमेरिकेने राबवलेल्या कठोर टॅरिफ धोरणानंतरही अर्थव्यवस्था मजबुतीने पुढे जात राहील, असा विश्वासही या अहवालात व्यक्त करण्यात आला आहे. महत्वाचे म्हणजे अमेरिकन अर्थव्यवस्था २.४ टक्के तर चीनची अर्थव्यवस्था साडेचार टक्के वेगाने वाढत राहील, असा अंदाज आहे. सध्या भारत जगातील सर्वाधिक आणि वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक आहे: भारताचा जीडीपी ७ टक्क्यांपेक्षा जास्त तर जागतिक आर्थिक विकास दर ३-३.५ टक्के आहे. यावरून भारतीय अर्थव्यवस्थेच्या वेगाचा अंदाज येतो. जागतिक बँक आणि आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या आकडेवारीनुसार, १९९५ मध्ये अमेरिकेचा जागतिक जीडीपीतील वाटा २४.४१ टक्के इतका होता. जपान १७.७२ टक्क्यांसह दुसऱ्या क्रमांकावर आणि तिसऱ्या क्रमांकावर जर्मनी ८.२९ टक्के होता. त्यावेळी भारत जगातील शीर्ष दहा अर्थव्यवस्थांतही नव्हता. आज दुसऱ्या क्रमांकावर असलेल्या चीनचा वाटा त्यावेळी (१९९५ मध्ये) केवळ २.३६ टक्के इतकाच होता. मात्र, २०२५ पर्यंतच्या आकडेवारीत चित्र पूर्णपणे बदलले आहे. अमेरिका आजही २६.८४ टक्के वाट्यासह शीर्षस्थानी आहे. तथापि, चीनने १६.९२ टक्के वाट्यासह जपानला केवळ मागे टाकले असून, सर्वात लक्षवेधी झेप भारताची ठरली आहे. ३.६८ टक्के वाट्यासह तो जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था म्हणून उदयास आला आहे. हे बदल केवळ टक्केवारीतील नाहीत; तर ते आर्थिक शक्तीच्या केंद्रस्थानात झालेले स्थलांतर ठरले आहे. पश्चिमेकडून पूर्वेकडे, असा हा केंद्रबिंदू बदलला आहे. १९९५ च्या तुलनेत आजचा भारत हा उत्पादन, गुंतवणूक, तंत्रज्ञान आणि उपभोगशक्ती या सर्व क्षेत्रांत निर्णायक भूमिका बजावत आहे. त्याचे प्रतिबिंब जागतिक पातळीवरील संस्थांच्या अहवालात वेळोवेळी उमटत आहे. भारताच्या अर्थव्यवस्थेच्या या वेगवान वाढीमध्ये इतर गोष्टींप्रमाणेच वाढती परदेशी गुंतवणूक हेही प्रमुख कारण मानले जात आहे. त्यामुळे भारत हा गुंतवणूकीसाठी सर्वोत्तम ठिकाणांपैकी एक का आहे? याचे कोडे अनेक देशांना पडले आहे. गेल्या काही काळात भारताला मोठ्या प्रमाणात परकीय गुंतवणूकीचा फायदा झाला आहे. भारत हा जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था असल्याने लक्षणीय परदेशी गुंतवणूक आकर्षित करण्याची क्षमता वाढली आहे. जगभरातील गुंतवणूकदार भारतात पैसे गुंतवण्यास इच्छुक आहेत. याशिवाय रेटिंग एजन्सींकडून येणाऱ्या सकारात्मक अहवालामुळे आणि भारताच्या दीर्घकालीन विकासामुळे सुद्धा परदेशी गुंतवणूक वाढीला चालना मिळाली आहे. या गुंतवणूकीमुळे आणि भारताच्या विस्मयकारक प्रगतीमुळे नाणेनिधीने नव्या अहवालात भारताच्या विकास दराचा अंदाज वाढवाल आहे. नाणेनिधीने आर्थिक वर्ष २०२६ साठी करण्यात आलेली वाढीव सुधारणा वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीतील अपेक्षेपेक्षा चांगल्या कामगिरीचे आणि चौथ्या तिमाहीतील मजबूत गतीचे प्रतिबिंब आहे आणि भारत जगासाठी एक प्रमुख वाढीचे इंजिन आहे असे म्हटले आहे. तथापि, अमेरिकेचे आयात शुल्क आणि जागतिक अनिश्चिततेमुळे आर्थिक घडामोडींवर परिणाम होण्याची शक्यता जागतिक स्तरावर वर्तवली जात आहे. त्याचा परिणाम भारतावर होऊ शकतो, असा इशाराही दिला आहे. आर्थिक वर्ष २०२५ मध्ये अन्नधान्याच्या किमती कमी झाल्यामुळे महागाईत मोठी घट झाल्यानंतर ती पुन्हा लक्ष्य पातळीच्या जवळ पोहोचेल अशी अपेक्षा आहे, असे नाणेनिधीने भारतीय रिझर्व्ह बँकेच्या २ ते ६ टक्के महागाई लक्ष्य बँडचा संदर्भ देत म्हटले आहे. यापूर्वी भारताच्या राष्ट्रीय सांख्यिकी विभागाने जीडीपी ७.४ टक्के पातळीवर वाढू शकतो असे सकारात्मक संकेत दिले होते. भारताचे व्यापारविश्व दिवसेंदिवस वाढत आहे. निर्यात वाढवण्यासोबतच भारताने आत्मनिर्भर भारत मिशनअंतर्गत सर्वच क्षेत्रात स्वावलंबी होण्याचा प्रयत्न सुरु केला आहे. त्यामुळेच सध्या भारताची अर्थव्यवस्था जगातील सर्वात मोठी चौथी अर्थव्यवस्था म्हणून नावारुपाला आली आहे. या पार्श्वभूमीवर दावोसमधील वर्ल्ड इकॉनॉमिक फोरममध्ये एका मुलाखतीत अमेरिकेची खासगी इक्विटी कंपनी कार्लिल ग्रुपचे सहसंस्थापक डेव्हिड रुबेनस्टीन यांनी भारत खूप वेगाने प्रगती करत आहे. येणाऱ्या दोन ते तीन दशकांत भारत जगातील सर्वात मोठी अर्थव्यवस्था ठरू शकतो, असा विश्वास व्यक्त करुन भारताच्या अर्थव्यवस्थेबाबत मोठे भाकित वर्तवले आहे. सध्या अमेरिकेची अर्थव्यवस्था सर्वात मोठी आहे. त्यानंतर दुसऱ्या क्रमांकावर चीन तर तिसऱ्या क्रमांकावर जर्मनी आहे. भारताची अर्थव्यवस्था जगातील चौथ्या क्रमांकाची आहे. एकीकडे जागतिक वाढ स्थिर राहण्याची अपेक्षा असताना तंत्रज्ञान क्षेत्रातील गती मंदावणार आहे. तरीही ती इतर क्षेत्रांतील कमकुवतपणाची काही प्रमाणात भरपाई करेल असेही महत्वाचे निरीक्षण आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने आपल्या अहवालात नोंदवले आहे. तथापि, वाढीवरील हा ताण २०२६ आणि २०२७ मध्ये कमी होईल. आर्थिक वर्ष २०२६ मध्ये जागतिक वाढ अनुक्रमे ३.३ आणि २०२७ मध्ये ३.२ टक्के राहण्याचा अंदाज वर्तवला. एकीकडे जागतिक स्थितीमुळे कमोडिटी बाजारात चंचलता कायम असतानाही नाणेनिधीच्या मते तेलाच्या किमती कमी राहिल्या आहेत आणि मागणीतील मंद वाढ व मजबूत पुरवठ्यामुळे त्या आणखी कमी होण्याची शक्यता आहे. १९९५ मध्ये जागतिक अर्थसत्ता अमेरिका तसेच जपानच्या ताब्यात होती. तथापि, २०२५ मध्ये चीन दुसऱ्या क्रमांकाची महासत्ता म्हणून भूमिका बजावत आहे. १९९५ मध्ये भारतीय अर्थव्यवस्था पहिल्या १० मध्येही नव्हती. तोच भारत आज चौथ्या स्थानावर आहे. धोरणे, आत्मविश्वास आणि जागतिक स्वीकार यात भारताने घेतलेली ही झेप आर्थिक इतिहासातील मोठी घटना ठरली आहे.

# श्री गुरु तेग बहादूर : मानवजातीचे खरे तारणहार

**अनिल आलुरकर,** उपसंचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय, अमरावती

**म**हान योद्धा, आध्यात्मिक व्यक्तिमत्त्व आणि मातृभूमीचे प्रेमी नववे शीख गुरू श्री गुरु तेग बहादूरजी यांनी केलेल्या सर्वोच्च बलिदानाची मानवता सदैव ऋणी राहील. त्यांनी विश्वबंधुता आणि धार्मिक स्वातंत्र्याचा संदेश दिला. धर्म, मातृभूमी आणि लोकांच्या हक्कांसाठी त्यांनी जाती-धर्माचा विचार न करता सर्वस्वाचा त्याग केला. म्हणूनच त्यांना 'हिंद दी चादर' या दुर्मिळ सन्मानाने गौरवण्यात आले. आपण श्री गुरु तेग बहादूरजींचा ३५० वा शहिदी समागम वर्ष साजरा करत असताना, धार्मिक स्वातंत्र्याचे महत्त्व आणि मानवजातीच्या व मातृभूमीच्या कल्याणाविषयी शिकवण देणाऱ्या त्यांच्या महान आदर्शांना पुन्हा समर्पित करणे आवश्यक आहे.

अतुलनीय श्री गुरु तेग बहादूरजींनी आपल्याला निर्भयपणे मुक्त जीवन जगण्याची शिकवण दिली. मुघल सम्राट औरंगजेबाने त्यांच्यावर आणि त्यांच्या कुटुंबावर केलेल्या अत्यंत छळास ते शरण गेले नाहीत, तर दैवी शांततेने तो सहन केला. त्यागमल ते तेग बहादूर असे झालेले त्यांचे परिवर्तन मानवी इतिहासात फार कमी समांतर असलेली धार्मिक दृढता, औचित्य, नैतिकता आणि शौर्याची कथा आहे. त्यांनी आपल्या प्राणांची आहुती दिली, पण सत्याचा मार्ग सोडला नाही. त्यांच्या देवत्वाची अशी शक्ती होती की जेव्हा त्यांच्या शिष्यांना त्यांच्या समोर मारण्यात आले, तेव्हा ते खोल ध्यानात राहिले. जेव्हा त्यांनी स्वतः परम त्याग केला, तेव्हाही ते ध्यानात मग्न होते. श्री गुरु तेग बहादूरजी म्हणाले की धर्म हा केवळ पूजा-पाठ नसून कर्तव्य आहे आणि एक आदर्श जीवनपद्धती आहे.

आजच्या तरुण पिढीने श्री गुरु तेग बहादूरजींच्या जीवनातून, चारित्र्यातून आणि त्यागातून प्रेरणा घेऊन मानवता आणि नैतिक मूल्ये अंगीकारण्याची गरज आहे, जेणेकरून भारत पुन्हा विश्वगुरू होईल. अत्याचार आणि अन्यायापुढे झुकण्यास त्यांनी ठाम नकार दिला. त्यांनी आदर्श आणि तत्त्वांच्या मार्गावर चालण्याची निवड केली. काश्मिरी पंडितांचे एक शिष्टमंडळ श्री गुरु तेग बहादूरजींना भेटण्यासाठी आजच्या श्री आनंदपूर साहिब येथे आले, ज्याला चक्क नानकी असेही म्हणतात. त्यांचे म्हणणे धीराने ऐकून घेतल्यानंतर, त्यांनी त्यांना औरंगजेबाला किंवा त्याच्या माणसांना सांगण्यास सांगितले की जर त्यांचे गुरू धर्म सोडतील, तरच ते आपला धर्म सोडतील.

त्यानंतर औरंगजेबाने केलेले कारनामे इतके भयानक होते की, आजही त्यांची आठवण झाल्यावर अंगावर काटा उभा राहतो. श्री गुरु तेग बहादूरजी आणि त्यांच्या तीन भक्तांना -भाई सती दास, भाई मती दास आणि भाई दयाला यांना बंदिवान करण्यात आले. त्यांनी इस्लाम स्वीकारण्यास नकार दिल्यावर त्या उदात्त त्रिकूटांना त्यांच्या गुरूंसमोर फाशी देण्यात आले. त्यांनी धर्मासाठी सर्वोच्च बलिदान दिले. इ.स. १६७५ मध्ये श्री गुरु तेग बहादूरजींनी अत्यंत शांतपणे हौतात्म्य पत्करले. जुन्या दिल्लीतील चांदणी चौकातील गुरुद्वारा शीशगंज साहिब हे 'त्याग' आणि 'बलिदान' यांच्या अंतिम गाथेचे प्रतीक आहे, ज्याला मानवी इतिहासात तोड नाही. भाई जैता सिंग यांनी श्री गुरु तेग बहादूरजींचे पवित्र शीश श्री आनंदपूर साहिब येथे नेले, जे जगभरातील शीखांसाठी सर्वात पवित्र स्थळांपैकी एक आहे.




**'हिंद दी चादर' श्री गुरु तेग बहादूर साहिबजी यांच्या शहिदीला ३५० वर्ष पूर्ण होत असल्याने महाराष्ट्र शासन आणि श्री गुरु तेग बहादूर साहिबजी ३५० वा शहिदी समागम राज्यस्तरीय समिती मार्फत नांदेड येथे आज व उद्या कार्यक्रम होत आहे. या निमित्ताने श्री गुरु तेग बहादूरजी यांच्या मानवजातीच्या कल्याणासाठी केलेल्या अनमोल कार्याची ही माहिती.**

त्यांच्या बलिदानामुळे 'वसुधैव कुटुंबकम्' या तत्त्वावर आधारित प्राचीन सभ्यता आणि संस्कृती केवळ नष्ट होण्यापासून वाचली नाही, तर एक दृढ आणि सर्वसमावेशक राष्ट्र म्हणून उदयास येण्याच्या आपल्या सामूहिक प्रयत्नांमध्ये तो एक ऐतिहासिक टप्पा ठरला. शीख धर्माचा पाया हा मानवी इतिहासातील सामान्य विकास नव्हता, तर तो सर्व प्रकारच्या अत्याचारांविरुद्ध मानवतेची ढाल बनला. ही एक महान परंपरा होती आणि आजही आहे. नववे शीख गुरू श्री गुरु तेग बहादूरजींनी केवळ लोकांचा धर्मरक्षणाचा संकल्प जपला आणि बळकट केला नाही, तर शीख धर्माला महानतेच्या पुढील स्तरावर नेले.श्री गुरु तेग बहादूरजींना माहीत होते की त्यांच्या भक्तांनी कोणताही पश्चात्ताप न करता धर्मासाठी किंमत मोजली. त्यांनी सर्व मोह नाकारले, सर्व वेदना आणि त्रास सहन केले, पण अश्रू ढाळले नाहीत. धर्मकार्यावरील त्यांची बांधिलकी आणि श्रद्धा अतूट होती. श्री गुरु तेग बहादूर यांचे जीवन हे धर्म आणि मानवजातीच्या कल्याणासाठी केलेल्या अतुलनीय बलिदानांचे सर्वोच्च उदाहरण आहे. औरंगजेबाच्या क्रूरतेपुढे त्यांनी कधीही शरणागती पत्करली नाही. प्रत्येक प्रश्नाला त्यांचे उत्तर स्पष्ट होते - मी शीख आहे आणि शीखच राहणार!


श्री गुरु तेग बहादूरजींच्या शिकवणीतून आणि त्यागातून आपल्याला अनेक आणि बहुआयामी धडे मिळतात. त्यांचा त्याग, सत्यावरील अढळ विश्वास, अहिंसा आणि सर्वांप्रती परोपकारी दृष्टीकोन आजही आपल्यासाठी प्रेरणादायी आहे. अंधश्रद्धा, जातीय भेदभाव आणि अस्पृश्यतेविरुद्ध त्यांनी संघर्ष केला, जेणेकरून प्रत्येक मानवाला आपल्या आवडीचे जीवन जगता येईल. धर्म हे सर्वांचे कर्तव्य आहे. खरा धर्म आपल्याला सर्वांशी चांगले वर्तन करण्याची आणि समाजाची शक्य तितकी सेवा करण्याची शिकवण देतो. त्यांनी दुर्बल आणि वंचितांच्या बाजूने ठामपणे उभे राहिले. त्यांचे पुत्र श्री गुरु गोविंद सिंगजी यांनी केवळ वडिलांची तत्त्वे आणि मूल्ये जपली नाहीत, तर खालसा निर्माण करून त्यांना पुढे नेले, जो धार्मिकता आणि न्यायासाठी लढण्याचे प्रतीक आहे.

आपण श्री गुरु तेग बहादूरजींचे हे महान वचन सदैव लक्षात ठेवले पाहिजे. ''आपण आपले जीवन सुख-दुःखात तसेच मान-अपमानात समान भावनेने जगले पाहिजे.'' त्यांच्या शिकवणीतून जीवनाचा उद्देश तसेच समता, समरसता आणि त्याग यांचे महत्त्व अधोरेखित होते. श्री गुरु तेग बहादूरजींचे महान शब्द हे मानवतेसाठी ऊर्जा आणि ज्ञानाचे चिरंतन स्रोत आहेत. गुरूंच्या शब्दांच्या मधुर पठणाचा भक्तांवर खोल परिणाम होत असे. त्यांनी अत्यंत शांततापूर्ण आणि मानवतावादी मार्गाने निरंकुश व धर्मांध शासकाशी संघर्ष केला. त्यांची शिकवण कालातीत आहे आणि येणाऱ्या पिढ्यांना सदैव प्रेरणा देत राहील. श्री गुरु तेग बहादूर यांचे जीवन आपल्याला प्रत्येक परिस्थितीला शांततेने आणि खंबीरतेने सामोरे जाण्याची तसेच सौहार्द, न्याय, समता आणि समरसतेवर आधारित सामाजिक व्यवस्था निर्माण करण्याची प्रेरणा देते.

# सेवेच्या माध्यमातून साक्षीदार होऊ या

**- अलका पाटील,** (उपसंपादक, जिमाका, नांदेड)

**भा**रतीय इतिहासात धर्म, मानवता, त्याग आणि बलिदान यांचे अद्वितीय प्रतीक म्हणून श्री गुरु तेगबहादुर साहिबजी यांचे नाव अजरामर आहे. धर्मस्वातंत्र्य, मानवमूल्ये आणि सत्यासाठी प्राणार्पण करणारे गुरु तेगबहादुर ''हिंद-दी-चादर'' म्हणून ओळखले जातात. त्यांच्या या महान शहिदीच्या ३५० व्या शहीदी समागम वर्षानिमित्त नांदेड शहरात २४ व २५ जानेवारी रोजी एक भव्य, ऐतिहासिक आणि आध्यात्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. हा भव्य समागम असर्जन परिसरातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ५३ एकर विस्तीर्ण मैदानावर होणार आहे. देश-विदेशातून जवळपास १० लाखांहून अधिक भाविक या पवित्र समागम कार्यक्रमासाठी नांदेडमध्ये दाखल होणार आहेत. हा केवळ धार्मिक कार्यक्रम नसून सेवा, समानता आणि मानवतेचा महासंगम ठरणार आहे.




या ऐतिहासिक शहीदी समागमाचे आयोजन नऊ समाजांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. राज्य शासनाचा अल्पसंख्याक विभाग, ''हिंद-दी-चादर'' श्री गुरु तेगबहादूर साहिबजी ३५० वी शहीदी समागम समिती तसेच सीख, सिकलीकर, बंजारा, लबाना, मोहियाल, सिंधी, वाल्मिकी, उदासीन संप्रदाय आणि भगत नामदेव वारकरी समाज या सर्व समाजांनी एकत्र येत एकतेचा आणि समतेचा आदर्श समाजासमोर ठेवला आहे. ही संयुक्त रचना स्वतः गुरूंच्या विचारांची जिवंत साक्ष आहे. ''सर्व धर्म समान, सर्व मानव समान'' हा संदेश या आयोजनातून ठळकपणे अधोरेखित होतो. कार्यक्रम स्थळी उभारण्यात येणाऱ्या मुख्य मंडपात दोनही दिवस श्री गुरु ग्रंथसाहिब विराजमान राहणार आहेत. गुरूंच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी येणारे सर्व भाविक, मान्यवर, पदाधिकारी व अतिथी कार्यक्रम स्थळी अनवाणी चालणार आहेत. ही परंपरा केवळ धार्मिक शिस्त नसून अहंकार त्याग, नम्रता आणि गुरूचरणी समर्पणाची भावना व्यक्त करणारी आहे. लाखो भाविक अनवाणी चालत गुरूच्या दर्शनासाठी येणार, हे दृश्यच सेवेतून भक्तीचा खरा अर्थ उलगडून दाखवणारे ठरणार आहे.तसेच संत शिरोमणी श्री नामदेव महाराज यांचे जन्म गाव नरसी नामदेव येथून वारकरी दिंड्या पायी चालत नांदेड येथे समागम स्थळी येणार आहेत.

या कार्यक्रमाच्या पूर्वतयारीचा एक अत्यंत प्रेरणादायी प्रसंग म्हणजे नुकतेच पार पडलेले भव्य श्रमदान. नांदेडचे जिल्हाधिकारी राहुल कर्डीले यांच्या उपस्थितीत कार्यक्रम स्थळी श्रमदान करण्यात आले. मैदानावरील खडे उचलणे, जमिनीची स्वच्छता करणे, चालण्यासाठी सुरक्षित व्यवस्था करणे ही सर्व कामे सेवाभावाने करण्यात आली. या भव्य शहीदी समागमात भाविकांच्या सोयीसाठी १२ भव्य लंगर उभारण्यात येणार आहेत. प्रत्येक लंगरमध्ये एकावेळी सुमारे ३ हजार भाविक बसून भोजन करू शकतील, अशी उत्कृष्ट व्यवस्था करण्यात आली आहे. २४ व २५ जानेवारी रोजी हे लंगर सकाळी ८ वाजल्यापासून रात्री १२ वाजेपर्यंत अखंड सुरू राहणार आहे. कार्यक्रम स्थळाच्या चारही बाजूंनी दोन किलोमीटरपर्यंतच्या परिसरात चहा, पाणी, नाश्ता, फळे यांचे विनामूल्य सेवा स्टॉल उभारण्यात येणार आहेत. कार्यक्रम स्थळी ८ प्रवेशद्वारांवर ८ जूताघरे उभारण्यात येणार असून, गरजेनुसार त्यांची संख्या वाढवण्यात येणार आहे. या शहीदी समागमात शीख धर्मीयांचा पारंपरिक युद्धकला प्रकार 'गतका' सादर करण्यात येणार आहे. तसेच नऊ समाजांच्या वतीने पारंपरिक कीर्तन, कथा आणि धार्मिक प्रवचनांचे आयोजन करण्यात येणार आहे. या ऐतिहासिक कार्यक्रमात हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी करण्यात येणार आहे.

नांदेड येथे होणारा हा ३५० वा शहीदी समागम म्हणजे केवळ एक धार्मिक कार्यक्रम नसून, सेवा, समानता, बलिदान आणि मानवतेचा महासोहळा आहे. या गौरवशाली ऐतिहासिक कार्यक्रमाचे साक्षीदार बनूया, सेवेत सहभागी होऊया.

# संपन्न पंजाबी भाषा

- प्रशांत दैठणकर

**गु**रू-शिष्य यांची परंपरा असलेल्या या मानवतावादी धर्मात शिष्य हा महत्वाचा या अर्थाने संस्कृत भाषेतून घेतलेला हा शब्द म्हणजे शीख (शिष्य) होय. पंजाब प्रांतात पंजाबी भाषा प्रामुख्याने बोलली जाते. ही भाषा ज्या लिपीत आहे ती लिपी म्हणजे गुरूमुखी होय. तर पाकिस्तान विभाजनानंतर पकिस्तानात गेलेल्या पंजाब प्रांतात याच बोलीसाठी शाहमुखी लिपी वापरली जाते. भाषिक वैशिष्ट्य बघताना ही लिपी इंडो-आर्यन आहे. पंजाबी गुरूंनी स्वीकारलेली व ज्या भाषेत रचना केल्या गेल्या व ज्यात श्री गुरू ग्रंथ साहिब आहे ती गुरूमुखी लिपी ११ ते १२ व्या शतकात प्राकृत भाषेपासून आजपर्यंत आली आहे. पाकिस्तानातील पंजाब प्रांतात वापरला जाणाऱ्या शाहमुखी लिपीवर लगतच्या पारशी (पर्शियन) आणि अरबी शब्दांचा प्रभाव अधिक आहेत. जगभरात असलेल्या साधारण २ कोटीहून अधिक पंजाबी भाषकांची भाषा मूळ पंजाबी हीच आहे.

देशात पंजाब राज्याची प्रमुख अशी असणाऱ्या पंजाबी भाषेला लगतच्या हरयाणा आणि दिल्ली राज्यातही अधिकृत भाषा म्हणून ओळख मिळालेली जगात कॅनडा, युनायटेड किंगडम, युनायटेड स्टेट्स ऑफ अमेरिका, ऑस्ट्रेलिया आदी देशात पंजाबी भाषकांची संख्या अधिक आहे. पाकिस्तानात असलेल्या पंजाब प्रांतात देखील पंजाबी ही सर्वाधिक बोलली जाणारी भाषा आहे. पंजाबमध्ये भाषिक महत्व लक्षात घेऊन भाषेच्या नावाने असणारे पंजाब विद्यापीठ आहे. याची स्थापना ३० एप्रिल, १९६९ रोजी पतियाला येथे करण्यात आली. या ठिकाणी पंजाबी भाषा संशोधन व तंत्रज्ञान शाखा आहे. या केंद्रातर्फे ऑनलाईन पंजाबी भाषेचा वापर तसेच सॉफ्टवेअर निर्मितीचे काम सातत्याने सुरू आहे. याचा माध्यमातून पंजाबी सायबर कमिटीला व सायबर क्षेत्रातील प्रत्येकाला मदत होत आहे. पंजाबी भाषेबाबतचा विश्वकोष तयार करण्यात आला असून हा ऑनलाईन विश्वकोष पतियाला येथील विद्यापीठाने २०१४ साली पंजाबीपिडीया उपलब्ध करून दिला आहे. १९५४ साली पंजाबी साहित्य अकादमीची स्थापना करण्यात आली. पंजाबी साहित्य अकादमी पुरस्कार १९५५ पासून सुरू करण्यात आला आहे. ज्ञानपीठ नंतर दुसऱ्या क्रमांकाचा हा पुरस्कार मानला जातो. या खेरीज कॅनडा-भारत शिक्षण संस्थेतर्फे प्रतिवर्षी ढाहान पुरस्कार देखील दिला जातो. पंजाब आणि महाराष्ट्र यांना जोडणारा महत्वाचा दुवा संत नामदेवांच्या रचना आहेत. त्यांच्या रचना शिख धर्मग्रंथात समाविष्ट आहेत. संवाद हा भाषेतूनच पुढे जातो. त्याच संवादाचा सेतू नांदेड नगरीत हिंद-दि-चादर श्री. गुरू तेग बहादूर साहिबजी यांच्या ३५० व्या शहिदी समागमातून होणार आहे.

**(संदर्भ : पंजाब विद्यापीठ व विकिपिडीया)**

# 'स्क्रोलिंग' थांबलं अन् इतिहास झाला जागा !

**डॉ. श्याम टरके,** सहायक संचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय, लातूर

**नां**देडच्या पवित्र मातीत श्री गुरु तेग बहादुर साहिब जी यांचा ३५० व्या भव्य शहीदी समागम वर्षानिमित्त कार्यक्रम होत आहे. महाराष्ट्र शासन आणि श्री गुरू तेग बहादूरजी यांच्या ३५० व्या शहीदी शताब्दी समितीच्या सहकार्याने निर्वैर निर्मित हिंद की चादर डॉक्युमेंटरी (माहितीपट), अन् सरताज यांचे गीत आता केवळ व्हायरल कंटेंट उरला नसून, ती एक संस्कारांची डिजिटल चळवळ बनली आहे. या चळवळीचा चेहरा आणि आवाज आहेत, डॉ. सतींदर सरताज. मूळचे पंजाबचे. सरताज केवळ गायक नाहीत, तर त्यांनी सुफी संगीतात डॉक्टरेट मिळवली आहे. त्यांच्या गळ्यातून जेव्हा ''सीस लेकर उसी ओर चल दिए...'' हे शब्द उमटतात, तेव्हा त्यात केवळ संगीत नसते, तर १७ व्या शतकातील वेदना आणि त्यागाचा हुंकार असतो. त्यांच्या याच भारदस्त आवाजामुळे तरुणाई पॉप गाणी सोडून इतिहासाकडे वळली आहे.

### अल्गोरिदमलाही फुटल्या भावना

आकडेवारीवर नजर टाकली तर थक्क व्हायला होते. २५ ऑक्टोबर २०२५ ला प्रदर्शित झालेल्या हिंद की चादर या गाण्याने युट्युबवर अल्पावधीतच २.७६ कोटी पेक्षा जास्त व्ह्यूजचा टप्पा ओलांडला आहे. तर १.८३ लाखांहून अधिक लाईक्स मिळाले आहेत. यावरून हे गीत लोकांनी फक्त ऐकले नाही, तर अनुभवले आहे, असे सिद्ध होते. केवळ युट्युबच नाही, तर इन्स्टाग्रामवरही या गाण्याची लाट आली आहे. विशेषतः ''सीस लेकर उसी ओर चल दिए'' या ओळींवर तरुणाईने बनवलेले हजारो रिल्स सध्या सोशल मीडियावर इमोशनल ट्रेंड बनले आहेत. दुसरीकडे, निर्वैर प्रॉडक्शन निर्मित १६ मिनिटांच्या डॉक्युमेंटरीला मिळालेले ४६ लाखपेक्षा जास्त व्ह्यूज हे सांगण्यासाठी पुरेसे आहेत की, चांगल्या कंटेंटला अल्गोरिदमची गरज नसते, त्याला भावनांचा आधार असतो.

### पुस्तकातील धडा मोठ्या पडद्यावर

शाळांमध्ये इतिहास शिकवला जातो, पण तो पडद्यावर दाखवला तर ? महाराष्ट्र शासनाने नेमका हाच धागा पकडला आहे. शाळा, महाविद्यालयांमध्ये एक आगळावेगळा राबवत श्री गुरु तेग बहादुर साहिब जी (गुरूजी) यांच्या जीवन,शिक्षण आणि सर्वोच्च बलिदानावर आधारित माहितीपट दाखवण्यात येत आहे. या माहितीपटात व्हीएफएक्स आणि ॲनिमेशनचा वापर करून जुन्या काळातील सेपिया आणि गोल्डन टोन उभा केला आहे. राज्यातील शाळांमधून गुरुजींचा इतिहास विद्यार्थी मोठ्या पडद्यावर पाहत आहेत. या इतिहासातून ते प्रेरणा घेत आहेत. इतिहास समजून घेत आहेत. जेव्हा विद्यार्थी पडद्यावर पाहतात, की गुरुजींच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यासाठी भाई लखी शाह बंजारा चक्क स्वतःचे घर जाळून टाकतात, तेव्हा वर्गातली शांतता खूप काही सांगून जाते. जे संस्कार शंभर व्याख्यानांतून करणे अवघड आहे, ते या माहितीपटातून होण्यास मदत होते.



**सध्याच्या फास्ट फूड, इन्स्टा रिल्सच्या युगात एखादा ट्रेंड किती काळ टिकतो ? फार तर २४ तास! पण, याच डिजिटल जगात ४०० वर्षे जुन्या इतिहासाने आजच्या जनरेशन झीला चक्क थांबायला भाग पाडले. निमित्त आहे, सुप्रसिद्ध सुफी गायक डॉ. सतींदर सरताज यांच्या आवाजातील हिंद की चादर या कलाकृतीचे.**

### महानायकांना सलाम

हा माहितीपट, गीत इतिहास जिवंत करते. अशा महानायकांना सलाम करते. हा सर्व इतिहास पुस्तकातून आता थेट लोकांच्या काळजात कोरल्या जात आहे. भाई मखखन शाह लबाना ज्यांनी समुद्राच्या तुफानातून वाचल्यावर खऱ्या गुरूंचा शोध लावला. भाई लखी शाह बंजारा यांनी दिल्लीच्या चांदनी चौकात मुघलांच्या नाकावर टिच्चून ''घरदार जळाले तरी चालेल, पण गुरुजींची शान राहिली पाहिजे,'' हा बाणा जपला. भाई जैता जी यांनी गुरुजींचे पवित्र शीर (मस्तक) सांभाळून, अतिशय कठीण प्रवास करत आनंदपूर साहिब येथे आणले व गुरू तेगबहादुरजी यांचे पुत्र गुरू गोविंदसिंहजी यांच्याकडे सुपूर्द केले.

### नांदेड विश्वासाचे केंद्र

या साऱ्याचा केंद्रबिंदू आहे, नांदेड. गोदावरीच्या काठावर वसलेले शहर. हे केवळ शहर नसून एक मोठे पवित्र तीर्थस्थान आहे. हे पवित्र स्थळ शीख धर्मातील पाच तख्तांपैकी एक आहे. येथे हजूर साहिब गुरूद्वारा, ज्याला तख्त सचखंड श्री हजूर अबचलनगर साहिब म्हणून ओळखले जाते. दहावे गुरू गुरू गोविंद सिंह यांचे अंतिम विश्रांतीस्थान आहे. श्री गुरू गोविंद सिंहांचे वास्तव्य या भूमीस लाभले. त्याचबरोबर गुरू गोविंद सिंहांनी त्यांच्यानंतर पवित्र ग्रंथालाच शाश्वत गुरू म्हणून घोषित केले. शीख धर्माचे अकरावे आणि अंतिम गुरू पवित्र गुरू ग्रंथ साहिब याच ठिकाणी आहेत. त्यामुळे या पवित्र भूमीत होत असलेल्या श्री गुरू तेग बहादूर साहिब जी ३५० शहिदी आणि श्री गोविंद साहिब जी ३५० व्या गुरतागद्दी शताब्दी निमित्ताने आयोजित कार्यक्रमाकडे संपूर्ण जग पाहत आहे.

शाळेतील मुलांच्या प्रभात फेऱ्या असोत किंवा राज्यातील सिनेमागृहात चित्रपटाच्या सुरूवातीला दाखवले जाणारे गुरूजींच्या जीवनावर आधारित गीत, माहितीपट असो, प्रत्येक ठिकाणाहून गुरूजींचे जीवन, शिकवण आणि त्यांचे सर्वोच्च बलिदान हा संदेश दिला जात आहे. औरंगजेबाच्या तलवारीपेक्षा गुरुजींचा शांततेचा आणि त्यागाचा मार्ग किती शक्तिशाली होता, हे समजून घेण्यासाठी एकदा तरी ही कलाकृती सर्वांनी पाहायलाच हवी.गुरू तेग बहादुर साहिब जी यांच्या शहिदीला ३५० वर्ष पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने भारतभर मोठ्या प्रमाणात कार्यक्रम होताहेत. परंतु नांदेड येथे होत असलेल्या या कार्यक्रमास विशेष असे महत्त्व आहे. या होत असलेल्या भव्य दिव्य अशा या श्री गुरू तेग बहादूर साहिब जी शहीदी आणि श्री गोविंद साहिबजी ३५० व्या गुरतागद्दी शताब्दी कार्यक्रमास उपस्थित राहून, प्रत्येकाने इतिहासाचे साक्षीदार देखील व्हायलाच हवे.

# लेखकांना आवाहन



दैनिक सत्यप्रभासाठी विविध व प्रासंगिक विषयांवर लेख लिहून पाठवावेत. योग्य त्या लेखांना प्रसिद्धी देण्यात येईल. लेखकांनी आपला लेख युनिकोडमध्ये टाईप करून **dainiksatyaprabha2015@gmail.com** या मेलवर पाठवावेत.

**कार्यकारी संपादक**

सत्यप्रभा

हे पत्र मे न्यूजवॉच इंडिया प्रा. लि. करिता प्रकाशक **शिवानंद दिंगबरराव महाजन** द्वारा प्रकाशित आणि मुद्रक **संदीप विलासराव पाटील**, सुजया पब्लिकेशन्स प्रा. लि. द्वारा मुद्रीत केले आहे. मुद्रण व प्रकाशन स्थळ : १२१/१२२ सी, नांदेड को. ऑप. इंडस्ट्रीयल इस्टेट. लि., शिवाजीनगर नांदेड-२

**संपादक : शिवानंद दिगंबरराव महाजन**

**कार्यकारी संपादक : संतोष रामराव पांडागळे**

या अंकातील लेखांमधील लेखकांची मते त्यांची वैयक्तिक आहेत. संपादकीय मंडळ त्यांच्या मताशी सहमत असेलच असे नाही.

https://epaper.esatyaprabha.com
र.क्र. २७९०९/७५.PR.No.-G2/RNP/NND-२५१/२०१८-२०२०
e_mail:dainiksatyaprabha2015@gmail.com

## संक्षिप्त

### दर्शनासाठी जाणाऱ्या तरुणाचा मृत्यू

**खुलताबाद:** कान्होबा (बडोद) येथे कानिफनाथ महाराजांच्या दर्शनासाठी निघालेल्या तरुणावर काळाने झडप घातली. हा अपघात खुलताबाद -फुलंब्री मार्गावरील गदाना गावाजवळ झाला. अपघातात सुशील सुखदेव घुसळे (वय ३३, रा. लहानीआळी, राजवाडा, खुलताबाद) याचा मृत्यू झाला तर दुचाकीवरील दुसरा तरुण अजय संजय शिरसाट (वय २६, रा. मालुंजा, ता. गंगापूर, सध्या मुक्काम साळीवाडा, खुलताबाद) गंभीर जखमी झाला आहे.

### व्यापाऱ्याच्या घरी जीएसटीची धाड

**बीड:** शहरातील मोंढा भागातील शनि मंदिर परिसरातील एका व्यापाऱ्याच्या निवासस्थानी जीएसटी विभागाने छापा मारला. ही कारवाई सकाळी सातपासून सलग नऊ तास चालली. पथकाने संगणकासह काही महत्त्वाची कागदपत्रे जप्त केली आहेत. या व्यापाऱ्याचे डिजिटल प्रिंटिंग, प्लॉटिंग तसेच जाहिरात एजन्सी असे विविध व्यवसाय आहेत. व्यवसायातील कोट्यवधींचे व्यवहार संशयास्पद असल्याचे निर्दशनास आल्यानंतर जीएसटी विभागाने ही धडक कारवाई केली.

### स्विफ्ट उलटून तरुणाचा मृत्यू

**माजलगाव:** माजलगावपाथरी रोडवरील रामनगर परिसरात बुधवारी रात्री अकराच्या सुमारास भीषण अपघात झाला. स्विफ्ट डिझायर कारवरील चालकाचा ताबा सुटल्याने कार उलटून एक तरुण जागीच ठार झाला, तर तिघेजण जखमी झाले. निवृत्ती भाऊसाहेब खेडकर (वय २५), असे त्याचे नाव आहे. खेडकर हे आपल्या स्विफ्ट डिझायर कारने माजलगावहून पाथरीकडे जात होते. खेडकर यांच्या डोक्याला गंभीर मार लागून त्यांचा जागीच मृत्यू झाला.

### मुरुम वाहतूक, टिप्पर पकडला

**केज:** अवैधरित्या मुरूम उत्खनन करून वाहतूक करणारे टिप्पर मुरुमासह होळ येथे अंबाजोगाईचे उपविभागीय अधिकारी दीपक वजाळे यांनी पकडले. महसूल अधिकाऱ्यांनी हे टिप्पर आणून तहसील कार्यालयात लावले आहेत. टिप्पर मालकास दोन लाख ५० हजार रुपयांचा दंड करण्यात आला आहे.

### निवडणूक काळात सुव्यवस्था राखा

**लातूर:** जि. प. व पंचायत समिती निवडणूक प्रक्रिया शांततापूर्ण व पारदर्शक वातावरणात पार पाडण्यासाठी व निवडणूक काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना प्रभावीपणे राबविण्यात याव्यात अशा सूचना जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी दिल्या आहेत.

---

प्रतिक्विंटल पाच ते ५,२०० रुपये भाव, बाजारपेठेत तेजी

# तीन वर्षांनंतर सोयाबीनच्या भावात उसळी, फायदा होणार साठेबाजांना

प्रतिनिधी । जालना

तीन-साडेतीन वर्षांपासून मंदीच्या गर्तेत अडकलेल्या सोयाबीन दराने अखेर उसळी घेतली असून बाजारपेठेत सोयाबीनचे दर ५ हजार ते ५ हजार २०० रुपये प्रतिक्विंटल वर पोहोचले आहेत. तीन वर्षांनंतर पहिल्यांदाच सोयाबीनने पाच हजारांचा टप्पा ओलांडल्याने बाजारपेठेत तेजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

हमीभाव योजनेंतर्गत नाफेडकडून भोकरदन तालुक्यातील आन्वासह वाकडी, भिवपूर, दानापूर, पिंपळगाव रेणुकाई सोयाबीन खरेदी केंद्र सूरू आहे. येथे ५ हजार ३२८ रुपये प्रतिक्विंटल या हमीभावाने सोयाबीन खरेदी करण्यात येत आहे. मात्र खासगी बाजारात सोयाबीनच्या दराने उसळी घेतल्याने हमीभाव खरेदी केंद्राकडे शेतकऱ्यांनी पाठ फिरविली आहे. नाफेड आणि खासगी व्यापाऱ्यांचे दर १०० ते २०० रुपयांचे दरम्यान कमी-अधिक आहे. त्यामुळे केंद्रापेक्षा खासगी बाजारात शेतकरी आपला माल आणत आहेत.

तीन वर्षापासून सोयाबीनचे दर ३८०० ते ४२०० भाव मिळत होता. आठवड्यापासून सोयाबीन तेलाच्या किमतीत वाढ झाली आहे, तर दुसरीकडे तीन वर्षात सोयाबीनला भाव चागला मिळतोय; परंतु शेतकऱ्यांजवळ साठवणुकीतील सोयाबीन शिल्लक नाही. अडचणीतील शेतकऱ्यांना मातामोल भावाने सोयाबान विकावे लागले. ३८०० ते ४२०० रुपयांदरम्यान स्थिर होते. खर्चही निघत नसल्याने शेतकरी अडचणीत होते. सध्या दराने ५३०० रुपयांची पातळी गाठली आहे.

२०२१-२२ नंतर प्रथमच अशी तेजी पाहायला मिठत आहे. आर्थिक अडचणीमुळे ७० ते ७५ टक्के शेतकऱ्यांनी सोयाबीन आधीच विकून टाकले आहे. आता केवळ मोठ्या शेतकऱ्यांकडे थोडाफार साठा शिल्लक असताना दरवाढ झालेली आहे.



### प्रमुख सोयाबीन उत्पादक देशांमध्ये घटीचा अंदाज

डीओसीची मागणी वाढली, शिवाय सरकी देखील महागली. त्यामुळे सोयाबीनला उठाव आला. अमेरिका, ब्राझील आणि अर्जेंटिना या प्रमुख सोयाबीन उत्पादक देशांमध्ये हवामानातील बदल, उत्पादन अंदाजात घट आणि निर्यातीवरील मर्यादा यामुळे जागतिक बाजारात दर वाढल्याचे बोलले जात आहे.

### वाढलेल्या भावाचा साठेबाजांचा फायदा

शेतकऱ्यांनी माल विकल्यानंतर दर वाढण्याची ही जुनीच पद्धत यंदाही पाहायला मिळत आहे. आता व्यापाऱ्यांकडील आणि साठेबाजांकडील सोयाबीनला चांगला दर मिळणार असल्याने शेतकऱ्यांचे नुकसान आणि साठेबाजांचा फायदा अशी स्थिती आहे.

---

# अनुसूचित जाती योजनांच्या निधी खर्चात धाराशिव जिल्ह्यात दिरंगाई, आयोग नाराज



प्रतिनिधी । धाराशिव

अनुसूचित जातींच्या योजना राबवण्यात व त्यासाठी नियोजित निधी खर्च करण्यात नगर पालिका क्षेत्रात दिरंगाई होत असल्याने राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य अ‍ॅड. गोरक्ष लोखंडे यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. त्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत जिल्ह्यातील विविध नगर परिषदांमधील अनुसूचित जाती घटकांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचा आढावा घेण्यात आला.

अनुसूचित जातीच्या योजनांचा आढावा घेण्यासाठी धाराशिव येथे कार्यालयात नगर परिषद परंडा, भूम, वाशी, कळंब व धाराशिव तसेच सहायक आयुक्त, समाज कल्याण व जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत अनुसूचित जाती घटकांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांचा मागील पाच वर्षांचा आढावा, आर्थिक दुर्बल घटकांवर करण्यात आलेल्या खर्चाची तपासणी, अनुसूचित जातीकरिता प्राप्त निधीचा वापर, कामांची अंमलबजावणी, तसेच लाड पागे समितीच्या शिफारशीनुसार नियुक्त्यांची स्थिती याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

याशिवाय लोकशाहीर अण्णा भाऊ साठे सुधार योजना, रमाई घरकुल योजना, अनुकंपा तत्त्वावरील प्रकरणे व इतर संबंधित बाबींचाही आढावा घेण्यात आला.

या बैठकीसाठी नगर परिषद परंडा, भूम, वाशी, कळंब व धाराशिव येथील मुख्याधिकारी उपस्थित होते.तसेच सचिन कवले, सहायक आयुक्त, समाज कल्याण आणि आयुब शेख, वरिष्ठ सहायक यांचीही उपस्थिती होती.

### निधी तातडीने खर्च करण्याच्या सूचना

अ‍ॅड.लोखंडे यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे सुधार योजना व रमाई घरकुल योजनेसाठी उपलब्ध निधी असूनही अपेक्षित प्रमाणात खर्च न झाल्याबाबत संबंधित नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांवर नाराजी व्यक्त केली. तसेच या योजनांच्या कामांबाबत दिरंगाई होत असल्याचे निदर्शनास आणून देत, निधी तातडीने खर्च करून लाभार्थ्यांना लाभ देण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

---

# वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे हिंगोलीत अधिवेशन

प्रतिनिधी । हिंगोली

महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेच्या वतीने २६ व २७ जानेवारी २०२६ रोजी राज्यस्तरीय अधिवेशन व आमसभा आयोजित करण्यात आली आहे. हे अधिवेशन महावीर भवन, रामलिला मैदानासमोर, हिंगोली येथे होणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र राज्य वृत्तपत्र विक्रेता संघटनेचे अध्यक्ष सुनील पाटणकर (वर्धा) यांनी कळवली आहे. या अधिवेशनाला महाराष्ट्रातून शेकडो वृत्तपत्र विक्रेते उपस्थित राहणार आहेत.

अधिवेशनाचे उद्घाटन २७ जानेवारी रोजी सकाळी दहा वाजता राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री तथा पालकमंत्री नरहरी झिरवाळ हे करणार आहेत. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार तानाजी मुटकुळे राहणार आहेत. स्वागताध्यक्ष म्हणून आमदार हेमंत पाटील व खासदार नागेश पाटील आष्टीकर हे उपस्थित राहणार आहेत. उद्घाटनानंतर मान्यवरांचे मार्गदर्शन, विविध चर्चासत्रे होणार आहे. दुसऱ्या सत्रामध्ये राज्य संघटनेची आमसभा दुपारी दोन वाजता होणार आहे. चार वाजता समारोप कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील ग्रामीण भागासह जास्तीत जास्त वृत्तपत्र विक्रेता बांधवांनी उपस्थित रहावे, असे आवाहन चंद्रकांत घाटोळ, गणेश मोतीराम वडगांवकर, सतीश कदम, बाबू जल्देवार, भागवत गायकवाड, बालाजी चंदेल, बालाजी सुताडे, सत्यनारायण देवरकोंडा, अनुप ठाकुर, दीपक नरवाडे, सरदारसिंह सुर्यवंशी (चौहान), संदीप कटकमवार, गणेश जुजाराव आदींनी केले आहे.

### या विषयांवर होणार सखोल चर्चा

या अधिवेशनात वृत्तपत्र विक्रेत्यांच्या प्रलंबित मागण्यांवर सखोल चर्चा करण्यात येणार आहे. स्वतंत्र विक्रेता महामंडळाची अंमलबजावणी, पेन्शन योजना, आरोग्य व शिक्षण सुविधा, विक्रेत्यांची अधिकृत नोंदणी, पेपर स्टॉलसाठी जागा उपलब्धता, शासकीय योजनांचा लाभ, वैद्यकीय सुविधा, विक्रेता भवन उभारणी तसेच रेल्वे व एसटी प्रवास सवलत या विषयावर ठराव मांडण्यात येणार आहेत. या राज्यस्तरीय अधिवेशनामुळे वृत्तपत्र विक्रेत्यांच्या समस्या शासन दरबारी प्रभावीपणे मांडल्या जाणार असून त्यांच्या हक्कांसाठी संघटनात्मक ताकद वाढीस लागणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

---

श्री गुरुबुद्धिस्वामी महाविद्यालयाच्या रासेयो शिबिरात चौधरी यांचे प्रतिपादन

# मोबाईलऐवजी अभ्यासावर लक्ष केंद्रित करावे

प्रतिनिधी । पूर्णा

विद्यार्थ्यांनी मोबाईल सोडून जास्तीत जास्त वेळ अभ्यास व पुस्तक वाचण्यात घालावावा. त्यामुळे विद्यार्थ्याचे भविष्यातील जीवन हे उज्ज्वल होईल व त्यांचे स्वप्न साकार होईल, असे प्रतिपादन इंजिनिअर नारायण चौधरी यांनी केले. ते श्री गुरुबुद्धिस्वामी महाविद्यालय व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विदयापीठ यांच्या संयुक्त विद्यामाने कानडखेड येथे आयोजित राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिराच्या समारोपप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य के. राजकुमार हे होते. उपप्राचार्य शिवसाब कापसे व गजानन कुरुंदकर यांची प्रमुख उपस्थिती होती. चौधरी पुढे म्हणाले की, अभ्यासाशिवाय यश शक्य नाही. जीवनात येणारे प्रत्येक संकट हे संधी म्हणून येते असते. संकट आले म्हणून घाबरून जाऊ नका. अपयश ही यशाची पहेली पायरी असते. संकटावर मात केल्याशिवाय यश मिळत नाही. राष्ट्रीय सेवा योजना शिबिरातून श्रम व बौद्धिक शिकवले जाते. त्याचा उपयोग व्यक्तिमत्व विकासासाठी करून घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. समारोप कार्यक्रमाची प्रस्तावना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. राजू शेख यांनी केली तर कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. दैवशाला कमठाणे यांनी आभार मानले. प्रा. डॉ. जितेंद्र पुल्ले, प्रा. डॉ. रवी बरडे, प्रा. डॉ. अजय कुऱ्हे, प्रा. डॉ. संतोष चांडोळे, प्रा. डॉ. रवींद्र राख, प्रा. डॉ. संजय दळवी, प्रा. डॉ. बाळासाहेब मुसळे, प्रा. डॉ प्रकाश भांगे, प्रा. डॉ. गंगाधर कापुरे, प्रा. डॉ. अलका कौसडीकर, प्रा. डॉ. पुष्पा गंगासागर, प्रा. डॉ. पल्लवी चव्हाण, प्रा. डॉ. स्वामी, प्रा. डॉ. वृषाली आंबटकर, प्रा डॉ. सोमनाथ गुजकर. प्रा. बालाजी असोरे आदींनी शिबिराला भेटी देऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



### शिबिराला मान्यवरांच्या भेटी

या शिबिरात वृक्षारोपण, जलसंधारण, परिसर स्वछता, बालविवाह प्रतिबंध व हुंडा विरोधी रॅली, आरोग्य शिबीर, रस्ते सफाई, नाले सफाई, स्त्री शिक्षणाचे महत्व आदी विषयांवर प्रत्यक्ष कृती करण्यात आली. शिबिराला राष्ट्रीय सेवा योजना संचालक प्रा. डॉ. मारोती गायकवाड, जिल्हा समन्वक प्रा. डॉ. पंढरीनाथ धोडगे, प्रा. हनुमंत कंधारकर, व्यवस्थापन सदस्य प्रा. डॉ. कालिदास गुडदे, डॉ. विशाल मोरे, संस्थेचे सचिव अमृतराज कदम यांनी भेटी दिल्या.

---

# रुग्णाला दारात सोडून सोनोग्राफी कक्ष केला बंद

प्रतिनिधी । बीड



येथील जिल्हा रुग्णालयातील गलथान कारभार समोर आला आहे. रुग्णालयाची लिफ्ट बंद असल्यामुळे नातेवाईकांनी तिसऱ्या मजल्यावरून एका वयस्कर महिलेला सोनोग्राफीसाठी खाली आणले. मात्र सोनोग्राफी सेंटरसमोर या महिलेला झोपविले असता पेशंट आणि नातेवाईकांसमोर सोनोग्राफी सेंटरमधील नर्सने कक्षाचा दरवाजा लावून वेळ संपली म्हणून निघून गेली. इतकी असंवेदनशीलता कर्मचाऱ्यांमध्ये कुठून निर्माण होते? सदर नर्सवर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

येथील जिल्हा रुग्णालयातील ५४ क्रमांकाचा वॉर्ड जो तिसऱ्या मजल्यावर आहे. तिथे ॲडमिट असलेल्या एका वृद्ध महिलेला नातेवाईकांनी लिफ्ट बंद असल्यामुळे स्ट्रेचरवर टाकून पायऱ्याने खालच्या मजल्यावर सोनोग्राफी सेंटरमध्ये आणले. सोनोग्राफी सेंटरसमोर स्ट्रेचर ठेवले, नातेवाईक बाजूला उभे राहिले. मात्र सोनोग्राफी सेंटरमध्ये कार्यरत असलेल्या नर्सने वेळ संपली आहे, असे म्हणत सोनोग्राफी सेंटरचा दरवाजा बंद केला व कुलूपा लावून ती निघून गेली, अशी तक्रार नातेवाईकांनी केली आहे.

---

# हायवेवर कंटनर लुटणारी टोळी गजाआड

प्रतिनिधी । धाराशिव

सोलापूर-धुळे महामार्गावर धावत्या कंटेनरमधून टायर लुटणाऱ्या टोळीतील दोन सराईत गुन्हेगारांना स्थानिक गुन्हे शाखेने पकडले. त्यांच्याकडून २९ नवीन टायर, ४ चोरीच्या मोटारसायकली आणि गुन्ह्यात वापरलेली चारचाकी असा एकूण ८ लाख २८ हजार ६५९ रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

रामजी शोभनाथ यादव हे २४ डिसेंबर २०२५ रोजी सोलापूर-धुळे महामार्गावरून कंटेनरमधून नवीन टायर घेऊन जात होते. लक्ष्मी पारधी पिढी (तेरखेडा) जवळ अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या कंटेनरमधील टायर्सची लूट केली होती. या प्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार यांनी गुन्हे शाखेच्या पथकाला तपासाच्या सूचना दिल्या होत्या. २१ जानेवारी रोजी गुन्हे शाखेचे पथक गस्त घालत असताना, अनिल मच्छिंद्र पवार (रा. लक्ष्मी पारधी पिढी, तेरखेडा) याने त्याच्या साथीदारांसह चोरी केल्याची आणि चोरीचा माल जंगलात लपवल्याची माहिती मिळाली.

या माहितीच्या आधारे पोलीस त्यांना पकडण्यासाठी गेले असता आरोपीने पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र पथकाने पाठलाग करून अनिल मच्छिंद्र पवार (३४) आणि नाना तानाजी शिंदे (२७, रा. भिकारसारोळा) या दोघांना ताब्यात घेतले. सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे देणाऱ्या आरोपींनी नंतर गुन्ह्याची कबुली दिली.

ही कारवाई पोलीस अधीक्षक रितू खोखर, अपर पोलीस अधीक्षक शफकत आमना यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विनोद इज्जपवार, सहायक पोलीस निरीक्षक सचिन खटके, हवालदार विनोद जानराव, नितीन जाधवर, बबन जाधवर, महेबूब अरब आणि रोहित दंडनाईक यांच्या पथकाने यशस्वीरीत्या पार पाडली.



### इतर पोलीस ठाण्याच्या हद्दीतही चोऱ्या

आरोपींनी पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार, इतर दोन साथीदारांच्या मदतीन हायवेवरील कंटेनरमधून टायर चोरले. पानगाव येथेही चोरी केली आहे. तसेच वाशी, बेंबळी, येरमाळा आणि भादा पोलिस ठाण्याच्या हद्दीतून मोटारसायकली चोरल्या. आरोपींच्या माहितीवरून पोलिसांनी लक्ष्मी पारधी पिढीमागील परिसरातून २९ नवीन टायर, ४ मोटारसायकली, रोख रक्कम आणि एक चारचाकी वाहन जप्त केले आहे.

---

## आंदोलनाच्या इशाऱ्यानंतर १५० प्रतिनियुक्त्या रद्द

प्रतिनिधी । बीड

जिल्हा परिषदेच्या शिक्षण, बांधकाम व आरोग्य विभागात सुरू असलेल्या मनमानी कारभारावर अखेर जिल्हा परिषद प्रशासनाला जाग आली असून, ''अतिरिक्त कामकाज'' या गोंडस नावाखाली करण्यात आलेल्या तब्बल १५० हून अधिक प्रतिनियुक्त्या रद्द करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

प्रजासत्ताक दिनी ध्वजारोहणासाठी येणाऱ्या पालकमंत्र्यांसमोर लक्षवेधी आंदोलनाचा इशारा सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी दिला होता. त्यामुळे प्रशासनाने प्रजासत्ताक दिनाच्या आधीच याची दखल घेतली.

---


न्याय | प्रेमसंबंधातून निर्माण झालेल्या वादातून संभाजीनगरात घडलेला प्रकार

# विवाहितेची गळा चिरून हत्या; आरोपीला जन्मठेप

प्रतिनिधी । छत्रपती संभाजीनगर

प्रेमसंबंधातून निर्माण झालेल्या वादातून एका विवाहितेची गळा चिरून हत्या करण्यात आली होती. या प्रकरणात आरोपी शुभम भाऊसाहेब बागुल (वय २८, रा. सिद्धार्थनगर, एन-१२ हडको) याला जन्मठेप व २० हजार रुपयांच्या दंडाची शिक्षा जिल्हा व सत्र न्यायाधीश आर. डी. खेडेकर यांनी ठोठावली.

या प्रकरणात मृत सुनंदा शिवाजी वाघमोडे (रा. डी सेक्टर, एन-१२ हडको) हिची मावशी शारदा बाबासाहेब वाहुळ यांनी फिर्याद दिली होती. त्यानुसार, सुनंदा व शुभम यांच्यात घटनेच्या पूर्वीपासून प्रेमसंबंध होते. यापूर्वी शुभमने प्रेमाचे आमिष दाखवून सुनंदाला पळवून नेल्याची तक्रारही तिच्या नातेवाईकांनी हर्सूल पोलिस ठाण्यात दिली होती. मात्र दोघांचे परस्पर संमतीने संबंध असल्याने कारवाई करण्यात आली नव्हती. दरम्यान, काही महिन्यांपासून दोघे एन-१२ हडकोतील सिद्धार्थनगर परिसरात एकत्र राहत होते. मात्र शुभमला दारूचे व्यसन असल्याने तो सुनंदाचा छळ करीत होता. या सततच्या त्रासाला कंटाळून सुनंदाने शुभमला सोडून आपल्या दोन मुलांसह एन-१२ हडको येथे भाड्याच्या खोलीत राहत होती. तरीही शुभम तिचा पाठलाग करत वारंवार त्रास देत होता. ६ डिसेंबर २०१८ रोजी सायंकाळी पाचच्या सुमारास शुभम सुनंदाच्या घरी गेल्यानंतर दोघांमध्ये जोरदार भांडण झाले. यानंतर रागाच्या भरात शुभमने कटरने सुनंदाचा गळा चिरून हत्या केली. प्रकरणात सिडको पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. तपास अधिकारी तत्कालीन उपनिरीक्षक सी. व्ही. ठुबे यांनी दोषारोपपत्र दाखल केले.



### कोर्टाने नोंदवले १५ साक्षीदारांचे जबाब

खटल्याच्या सुनावणीवेळी सहायक सरकारी लोकाभियोक्ता अरविंद बागूल यांनी १५ साक्षीदारांचे जबाब नोंदवले. त्यात आरोपीच्या हाताचे ठसे, मृत सुनंदा हिच्या गळा २७ सेमी कट झालेला होता, तर कटरची अर्धी ब्लेड गळ्यात अडकलेली असल्याची डॉक्टरांची साक्ष महत्त्वाची ठरली. विशेष म्हणजे खून करून पळताना आरोपीला पाहणाऱ्या तीन साक्षीदार महिला फितुर झाल्या. सुनावणीअंती न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवून भादंवि कलम ३०२ अन्वये जन्मठेप व २० हजार रुपये दंड, दंड न भरल्यास सहा महिने अतिरिक्त कारावासाची शिक्षा न्यायालयाने ठोठावली. प्रकरणात पैरवी अधिकारी म्हणून जमादार बी.ए. बोर्डे, सुनील जाधव यांनी काम पाहिले.

---

## तब्बल बारा वर्षांनंतर पोलिसांच्या प्रयत्नाने मायलेकाची भेट

प्रतिनिधी । परभणी

सेलू पोलिसांनी केलेल्या संवेदनशील प्रयत्नामुळे तब्बल १२ वर्षांपासून हरवलेली आई अखेर आपल्या मुलाला भेटली. या कामगिरीमुळे राज्याच्या पोलिसांचे सर्वत्र कौतुक होत आहे. भेट झाल्यानंतर माय लेकरांच्या डोळ्यातून अश्रुच्या धारा वाहू लागल्या. बारा वर्षांपूर्वी मुंबईतील सीएसटी परिसरातून बेपत्ता झालेली गोदावरी राऊत ही महिला रस्त्यावर भीक मागत जीवन जगत होती. मुंबई पोलिसांच्या भिक्षेकऱ्यांविरोधातील कार्यवाहीदरम्यान १३ जानेवारी रोजी ती एका रस्त्यावर आढळून आली. तिने आपले नाव गोदावरी राऊत असल्याचे सांगितले. संबंधित पथकाने तिला सर जे. जे. मार्ग पोलीस ठाण्यात आणून कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली.

---

# रस्ता नसल्यामुळे मतदानावर बहिष्कार, ब्रह्मवाडीत वेशीवर झळकले निषेध बॅनर

प्रतिनिधी । लातूर

स्वातंत्र्याला ७५ वर्षे उलटूनही साध्या पक्क्या रस्त्यासाठी संघर्ष करावा लागत असल्याने अहमदपूर तालुक्यातील ब्रह्मवाडी येथील ग्रामस्थांनी आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीवर पूर्णतः बहिष्कार टाकण्याचा निर्णय घेतला आहे. ''जोपर्यंत रस्ता होत नाही, तोपर्यंत मतदान नाही'' असा पवित्रा घेत गावकऱ्यांनी गावच्या मुख्य रस्त्यावर आणि घराघरांवर बहिष्काराचे बॅनर लावून संताप व्यक्त केला आहे.

ब्रह्मवाडी ते मोघा (ग्रामीण मार्ग ४२) हा साधारण २ ते ३ किलोमीटरचा रस्ता गेल्या अनेक वर्षांपासून अत्यंत दुरवस्थेत आहे. ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार स्वातंत्र्यानंतर या रस्त्याचे केवळ एकदाच डांबीकरण झाले. गेल्या काही दशकांत साधी डागडुजीही करण्यात आली नाही. रस्ता पूर्णपणे उखडल्यामुळे शेतकऱ्यांना खते, बियाणे आणताना आणि शेतमाल बाजारात नेताना मोठी कसरत करावी लागते. रस्त्याअभावी गावात रुग्णवाहिका किंवा खासगी वाहने वेळ वर येत नाहीत. तसेच विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यासाठी चिखल तुडवत पायपीट करावी लागते. निवडणुका आल्या की राजकीय नेते मतांसाठी गावात येतात आणि रस्ता करण्याचे आश्वासन देतात.

मात्र, निवडणूक जिंकल्यानंतर पाच वर्षे या गावाकडे कोणीही फिरकत नाही, असा अनुभव ग्रामस्थांनी बोलून दाखवला. वारंवार निवेदने देऊनही जिल्हा परिषद प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी याकडे दुर्लक्ष केल्याने अखेर ग्रामस्थांनी सामूहिक बैठकीत निवडणुकीवर बहिष्काराचा एकमुखी ठराव मंजूर केला.

गावकऱ्यांनी केवळ ठराव करूनच थांबले नाहीत, तर संपूर्ण गावात निषेधाचे वातावरण आहे.

### प्रशासनाला कळवला निर्णय

खराब झालेल्या रस्त्याच्या मध्यभागीच बॅनर लावून प्रशासनाच्या डोळ्यांत अंजन घालण्याचे काम ग्रामस्थांनी केले आहे. प्रशासकीय अधिकारी मनधरणी करण्याचा प्रयत्न करत असले, तरी ग्रामस्थ आपल्या भूमिकेवर ठाम आहेत.

## संक्षिप्त

### बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन

**मुखेड:** शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने विविध सामाजिक उपक्रम राबवून बाळासाहेब ठाकरे यांना अभिवादन करण्यात आले. शहरातील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या कार्यालयात प्रथम बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन सहसंपर्क प्रमुख भागवत जाधव यांनी केले यावेळी शिवसेना तालुकाप्रमुख उमेश पाटील आडलूरकर जिल्हा उपसंघटक शरद कोडगिरे जेस्ट शिवसैनिक सखाराम पाटील इंगोले विधानसभा समन्वयक सौ. वडजे सुनिता मनमथ खंकरे ,सुशील पत्की श्रीनिवास पाटील वडजे,सरपंच प्रभाकर शिंदे ,माजी सरपंच पंडित पाटील शिंदे बालाजी कदम सचिन देबडवार यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

### हळदी-कुंकवाचा कार्यक्रम उत्साहात

**धुपा:** जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या कृपा-आशीर्वादाने व परमपूज्य कानिफनाथ महाराज यांच्या दिव्य प्रेरणेने दि. २२ जानेवारी रोजी नायगाव तालुका सेवा समिती व धुप्पा सेवाकेंद्राच्या वतीने शेकडो महिलांच्या उपस्थिती भक्तिमय वातावरणात भव्य व दिव्य हळदी-कुंकवाचा सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला.या प्रसंगी मराठवाडा पीठ महिला निरीक्षक सौ. संतोश्रीताई पाटील माऊलीकर, नांदेड जिल्हा संजीवनी प्रमुख पार्वतीताई जाधव, तेलंगणा पीठ धर्मक्षेत्र प्रमुख सौ. संगीताताई साखरे, माजी बालकल्याण सभापती निर्मलाताई मोहनराव पाटील धुप्पेकर, जनम प्रवचनकार गंगाधर कोकणे, संगीत गायकवाड आदी मान्यवरांची उपस्थिती होती. सुरुवातीस संतसंग सेवा केंद्र धुप्पा महात्मा बसवेश्वर नगर येथून जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्यजी महाराज यांच्या प्रतिमेचे पुष्पवृष्टीसह मंगलमय आगमन करण्यात आले. त्यानंतर यजमान सुधाकर देरेगावे व अनिल जांभळे या दोन्ही जोडप्यांच्या हस्ते धुपारती संपन्न झाली.

### दत्तात्रय कोळनुरे यांचे निधन

**बिलोली:** तालुक्यातील आदमपूर येथील दत्तात्रय लक्ष्मण कोळनुरे यांचे दि.२३ रोजी सायंकाळी अपघाती निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शनिवार दि. २४ रोजी



अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पत्नी,दोन मुले,दोन सूना,एक मुलगी,जावई नातवंडे असा परिवार आहे.

---

पाणीदार मोहिमेअंतर्गत शेतीला नवा बहर

# जलताराचा लाभ शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवा: जिल्हाधिकारी कर्डिले

प्रतिनिधी । नांदेड

पाणीदार नांदेड या मोहिमेअंतर्गत जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांपर्यंत 'जलतारा'चा लाभ पोहोचविण्याचे उद्दिष्ट ठेवून काम करण्यात यावे, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात ऑनलाइन व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे जलतारा प्रकल्पाच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या वेळी मुख्य कार्यकारी अधिकारी मेघना कावली उपस्थित होत्या.

या आढावा बैठकीत जिल्हाधिकारी कर्डिले यांनी तालुकानिहाय जलतारा कामांच्या प्रगतीचा आढावा घेतला. शेतकऱ्यांकडून प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांना तत्काळ प्रशासकीय मंजुरी देऊन कामे सुरू करावीत, असे निर्देश देण्यात आले.

मस्टर काढण्यासंदर्भात निर्माण झालेल्या तांत्रिक अडचणी जिल्हास्तरावरून सोडविण्यात आल्या आहेत. मंजूर झालेल्या सर्व जलतारांचे मस्टर तत्काळ काढण्याचे निर्देश देण्यात आले. या कामांचा फेब्रुवारीच्या पहिल्या आठवड्यात प्रत्यक्ष स्थळ भेटीद्वारे आढावा घेण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.या वेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत, उपमुख्य कार्यकारी अधिकारी अमित राठोड, नोडल अधिकारी चेतन जाधव, प्रादेशिक समन्वयक दिनेश खडसे, एमआयएस समन्वयक रूपेश झंवर, गट विकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी, मनरेगाचे सहायक कार्यक्रम अधिकारी, तांत्रिक सहायक, लिपिक-कम-संगणक चालक, सीएसओ प्रतिनिधी उपस्थित होते.

#### उत्पादनक्षमता वाढविण्याचा उद्देश



जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या संकल्पनेतून नांदेड जिल्ह्यासाठी सुमारे एक लाख जलतारा प्रकल्प निर्माण करण्याचे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. जिल्हा प्रशासनामार्फत संपूर्ण जिल्ह्यात हा उपक्रम प्रभावीपणे राबविण्यात येत आहे.पावसाचे अतिरिक्त पाणी शेतात मुरवून भूजलपातळी वाढविणे, जमिनीची धूप रोखणे, जमिनीचा पोत सुधारणे व उत्पादनक्षमता वाढविणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे

#### गावस्तरावर कॅम्प घेवून जागृती

मनरेगाच्या तांत्रिक सहायकांमार्फत गावस्तरावर कॅम्प आयोजित करून प्रस्ताव तयार करावेत व अधिकाधिक शेतकऱ्यांपर्यंत या योजनेचा लाभ पोहोचवावा, असे स्पष्ट करण्यात आले. तालुक्यांना देण्यात आलेली उद्दिष्टे ही किमान स्वरूपाची असून शेतकऱ्यांच्या मागणीनुसार अधिक जलतारांचे प्रस्ताव प्राप्त झाल्यास सर्व प्रस्तावांना मान्यता देण्यात यावी, असेही कर्डिले यांनी सांगितले. या प्रक्रियेत कोणतीही टाळाटाळ झाल्यास कठोर कार्यवाही करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला.

---

बाजारपेठेत तेजीचे वातावरण, तीन वर्षात मिळाला

# प्रथमच सोयाबीन पाच हजार पार

प्रतिनिधी । नांदेड

तीन-साडेतीन वर्षांपासून मंदीच्या गर्तेत अडकलेल्या सोयाबीन दराने अखेर उसळी घेतली असून बाजारपेठेत सोयाबीनचे दर ५ हजार ते ५ हजार तीनशे २४ रुपये प्रतिक्विंटल वर पोहोचले आहेत. तीन वर्षानंतर पहिल्यांदाच सोयाबीनने पाच हजारांचा टप्पा ओलांडल्याने बाजारपेठेत तेजीचे वातावरण निर्माण झाले आहे.

हमीभाव योजनेंतर्गत नाफेडकडून सोयाबीन खरेदी केंद्र सूरू आहे. येथे ५ हजार १६० रुपये प्रतिक्विंटल या हमीभावाने सरासरी सोयाबीन खरेदी करण्यात येत आहे, मात्र. खासगी बाजारात सोयाबीनच्या दराने उसळी घेतल्याने हमीभाव खरेदी केंद्राकडे शेतकऱ्यांनी पाठ फिरविली आहे. नाफेड आणि खासगी व्यापाऱ्यांचे दर १०० ते २०० रुपयांचे दरम्यान कमी-अधिक आहे. त्यामुळे केंद्रापेक्षा खासगी बाजारात शेतकरी आपला माल आणत आहेत.अशा परिस्थितीत डीओसीची मागणी वाढली, शिवाय सरकी देखील महागली. त्यामुळे सोयाबीनला उठाव आला अमेरिका, ब्राझील आणि अर्जेंटिना या प्रमूख सोयाबीन उत्पादक देशांमध्ये हवामानातील बदल, उत्पादन अंदाजात घट आणि निर्यातीवरील मर्यादा यामुळे जागतिक बाजारात दर वाढल्याचे बोलले जात आहे. आर्थिक अडचणीमुळे ७० ते ७५ टक्के शेतकऱ्यांनी सोयाबीन आधीच विकून टाकले आहे. आता केवळ मोठ्या शेतकऱ्यांकडे थोडाफार साठा शिल्लक असताना दरवाढ झालेली आहे.

#### चांगल्या भावामुळे शेतकरी झाला आनंदी

तीन वर्षापासून सोयाबीनचे दर ३८०० ते ४२०० भाव मिळत होता. आठवड्यापासून सोयाबीन तेलाच्या किमतीत वाढ झाली आहे, तर दुसरीकडे तीन वर्षात सोयाबीनला भाव चागला मिळतोय; परंतु शेतकऱ्यांजवळ साठवणुकीतील सोयाबीन शिल्लक नाही. अडचणीतील शेतकऱ्यांना मातामोल भावाने सोयाबान विकावे लागले. ३८०० ते ४२०० रुपयांदरम्यान स्थिर होते.खर्चही निघत नसल्याने शेतकरी अडचणीत आहेत, मात्र, सध्या दराने ५३०० रुपयांची पातळी गाठली आहे. २०२१-२२ नंतर प्रथमच अशी तेजी पाहायला मिठत आहे.

#### भाववाढीचा साठेबाजांना मिळाला फायदा

शेतकऱ्यांनी माल विकल्यानंतर दर वाढण्याची ही जुनीच पद्धत यंदाही पाहायला मिळत आहे. आता व्यापाऱ्यांकडील आणि साठेबाजांकडील सोयाबीनला चांगला दर मिळणार असल्याने शेतकऱ्यांचे नुकसान आणि साठेबाजांचा फायदा अशी स्थिती आहे.

---

## सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांना मनपात अभिवादन



प्रतिनिधी । नांदेड

नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त महानगरपालिकेच्यावतीने मुख्य प्रशासकीय इमारत,स्थायी सभागृह कक्ष येथे शुक्रवारी (दि.२३) सकाळी ११ वाजता मनपा आयुक्त डॉ.महेशकुमार डोईफोडे यांच्या हस्ते नेताजी सुभाषचंद्र बोस व बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले.

यावेळी अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार, उपायुक्त नितीन गाढवे,उपायुक्त स.अजितपालसिंग संधु, कार्यालय अधिक्षक पद्माकर कावळे, जनसंपर्क अधिकारी सुमेध बनसोडे यांच्यासह अनेक कर्मचारी यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान नेताजी सुभाषचंद्र बोस यांची राष्ट्रभक्ती आणि देशासाठी केलेला संघर्ष हा मान्यवरांनी अधोरेखीत केली आहे.त्याच प्रमाणे शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा राष्ट्राच्या प्रगतीसाठी कणखरबाणा आधोरेखीत केला आहे.राज्याच्या परिर्वतनासाठी वेळोवेळी त्यांनी घेतलेली कठोर भूमिका हि राष्ट्रहितासाठी हे आपणाला मान्यच करावे लागेल. राष्ट्रहित आणि हिंदूत्वाच्या राखण कशी करता येईल याबाबतचे मार्गदर्शन मान्यवरांनी केले आहे.

---

जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षकांची १०८ पदे रिक्त

# शाळांमध्ये शिक्षणाचा खेळखंडोबा

प्रतिनिधी । माहूर

जिल्हा परिषदच्या प्राथमिक शाळेत १३२ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत, शिक्षकांची तिथे ५ पदे मान्य असून आजमितीस केवळ दोनच शिक्षक कार्यरत असल्याने विद्यार्थ्यांचे प्रचंड शैक्षणिक नुकसान होत आहे. रिक्त जागा तातडीने न भरल्यास शाळेला कुलूप ठोकण्याचा ईशारा पालकांनी गटशिक्षणाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात दिला आहे.

माहूर तालुक्यातील जिल्हा परिषदच्या शाळेत प्राथमिक शिक्षकांची तब्बल १०८ पदे रिक्त आहेत. त्यामुळे गटशिक्षणाधिकारी कार्यालयाकडून येते. परंतु तात्पुरती नियुक्ती मिळालेले पर्यायी शिक्षकाची व्यवस्था करण्यात शिक्षक त्या शाळेत जातीलच, याची ठामपणे कुणालाच खात्री देता येत नाही.त्यामुळे तालुक्यातील शाळेतील विशेषतः दुर्गम भागातील विद्यार्थ्यांची मोठी शैक्षणिक दैना होत आहे. ही बाव लक्षात घेऊन शालेय व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी व पालक गटशिक्षणाधिकारी कार्यालयाच्या सारखा खेटा घालत आहेत. रिक्त जागा संदर्भात प्रभारी गटशिक्षणाधिकारी संतोष शेटकार यांचेशी संपर्क केला असता ते तारखेवर तारखा देत आहेत. गटशिक्षणाधिकारी यांना दिलेल्या निवेदनावर रंजित पवार, युवराज जाभय, शरद जाधव, पंडित पवार, सय्यद नूर, प्रवीण केचे, दिनेश वायकुळे, राम खाडे अशा ३५ पालकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

दरम्यान शिक्षकांची संख्या कमी असल्यामुळे अभ्यास पुर्ण करणे अवघड जात आहे. वेळेत अभ्याक्रम पुर्ण करण्यात यावा यासाठी कुठलीही ठोस यंत्रणा नाही.विद्यार्थ्यांना योग्य शिक्षण देण्यात यावे यासाठी पात्र शिक्षकांची नेमणूक करणे गरजेचे आहे.यासाठी पालकांनी गेल्या अनेक दिवसांपासून मागणी केली होती ती अद्याप पुर्ण होवू शकली नाही.

#### दोन शिक्षकांवर चालतो शाळेचा कारभार

तांदळा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत इयत्ता पहिली ते पाचवीपर्यंत वर्ग असून १३२ विद्याधर्थी शिक्षण घेत आहेत, तिथे कार्यरत दोन शिक्षकापैकी एक शिक्षक कार्यालयीन कामानिमित्त रोजच शाळेबाहेर असल्याने शाळेचा भार केवळ एकाच शिक्षकाला उचलावा लागत असल्याची व्यथा पालकांनी आपल्या तकारीत मांडली आहे. ग्रामीण भागातील शिक्षणाचा बोजवारा उडूनही शासनाचा शिक्षण विभाग मात्र तोंडावर बोट ठेऊन गप्प आहे, याचा संताप पालकांमधून होत आहे.

---

## शाळेत आनंद नगरीच्या उपक्रमास प्रतिसाद



प्रतिनिधी । मुदखेड

तालुक्यातील नागेली येथील शाळेत आनंद नगरी म्हणजेच खरी कमाई उपक्रम घेण्यात आला. यामुळे इयत्ता पहिलीपासून त्याठिकाणी विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेतला.या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी कमी खर्चात जास्तीत जास्त कमाई कशी करता येईल आणि त्या केलेल्या वस्तूंची खरेदी विक्री कशी प्रत्यक्ष स्वरूपात होत असते,कामे करताना काय काय तयारी करावी लागते आणि कसली कसली नियोजन करावे लागते कोणती जबाबदारी येते. खाद्यपदार्थ करताना दुकानातून कच्चामालांचे त्यांच नियोजन कसं करावं लागतं आणि तयार करून कशाप्रकारे विकून आपल्याला नफा होईल याचा पण विद्यार्थी विचार करूनच ग्राहकांशी कसं बोलावं लागतं यांचे प्रात्यक्षिक रूपांतर अनुभव विद्यार्थ्यांनी घेतला, त्यांना नवीन अनुभव मिळाला. जीवनातील नवीन अनुभव म्हणजे आनंद नगरी खरी कमाई होय. शाळेच्या मुख्याध्यापिका लोणे धर्मश्री दुलबा लहानकर कांबळे नागोराव व,टोम्पे राजू, नरवाडे वंदना ,कदम वीणा यांनी याबाबत मार्गदर्शन विद्यार्थ्यांना करण्यात आले.

---

# मनरेगा कंत्राटी कर्मचाऱ्यांचे काळ्याफिती लावून आंदोलन

प्रतिनिधी । नरसी



महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना योजनेअंतर्गत राज्यामध्ये समन्वयक , कार्यक्रम व्यवस्थापक , सहाय्यक कार्यक्रमाधिकारी , पॅनल तांत्रिक अधिकारी इतर पदावर विविध कार्यालयात काम करणाऱ्या कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित मागण्यांकडे शासन दुर्लक्ष करीत असल्यामुळे आज दिनांक २३ पासून काळ्याफिती लावून राज्यव्यापी आंदोलनास सुरुवात केली असल्याचे दिसून येत आहे .

या अनुषंगाने नायगांव तालुका पंचायत समिती व तहसील कार्यालय अंतर्गत कंत्राटी अधिकारी व कर्मचारी यांनी दि. २३ , २४ ,२५ हे तीन दिवस काळ्याफिती लावून कामकाज करीत असल्याचे सांगितले आहे.

दरम्यान नायगांव तालुक्यातील तांत्रिक सहाय्यक एस. पी. बोडके , ए. एस. पांचाळ , बी.एल. जाधव , डी.बी. काळे , सहाय्यक कार्यक्रमाधिकारी पी. एस. सूर्यवंशी, व्ही.बी .कदम , डी.एल. रानवळकर , बी.पी. शिंदे , आर. एस. भिसे , जी.पी. चिकनपल्ले , ए. एस. गाडे आदी कर्मचारी हे या राज्यव्यापी आंदोलनात सक्रिय सहभागी झाले आसल्याचे दिसून येते .

---

### तंत्र प्रदर्शनास प्रशिक्षणार्थ्यांचा उत्सफूर्त सहभाग

प्रतिनिधी । नांदेड

औदयोगिक प्रशिक्षण संस्थामधील प्रशिक्षणार्थ्यांच्या प्रशिक्षणाबरोबरच कौशल्यास वाव मिळावा, नवनविन संकल्पना, नाविन्यता विकसीत व्हावी या उद्देशाने जिल्हास्तरीय तंत्रप्रदर्शनाचे श्री गुरू गोबिंदसिंघजी शासकीय औदयोगिक प्रशिक्षण संस्था नांदेड येथे आयोजन करण्यात आले होते. प्रदर्शनामध्ये संपूर्ण जिल्हयातील सर्व शासकीय व खाजगी औदयोगिक प्रशिक्षण संस्था मिळून जवळपास २४ संस्थानी सहभाग नोंदवला. यावेळी कार्यक्रमाला मोठ्या प्रतिसाद मिळाला आहे.

---

## राजवाडी येथे सैनिक दाम्पत्याचा सत्कार

प्रतिनिधी । तामसा



हदगांव तालुक्यातील राजवाडी येथील घिसेवाड दांपत्य यांनी आपले चे प्रशिक्षण पूर्ण करून प्रथमच आपल्या जन्मभूमी राजवाडी येथे आल्यावर त्यांचा गावकरी व आमदार यांनी सन्मान करून सत्कार केला.

राजवाडी येथे निरंजन पांडुरंग घिसेवाड व निकिता निरंजन घिसेवाड दोन्ही दांपत्य मध्ये निवड होऊन निरंजन घिसेवाड व पोटा येथील विकास शेलार या दोघांनी प्रशिक्षण पूर्ण करुन आल्याबद्दल हदगाव-हिमायतनगर विधानसभा मतदारसंघाचे आ. बाबुराव कदम कोहळीकर यांनी त्यांचा सन्मान व सत्कार करुन देशसेवेसाठी शुभेच्छा दिल्या.

बीएसएफ सैनिक देशाच्या सीमांचे रक्षण करणारे शूर जवान आहेत. कुटुंबापासून दूर राहून, दिवसरात्र सीमेवर कर्तव्य बजावतात, जेणेकरून देश सुरक्षित राहील. त्यांचे जीवन देशाच्या सेवेसाठी समर्पित असते, जिथे शिस्त, निष्ठा आणि दृढनिश्चय महत्त्वाचे असतात. बीएसएफ सैनिक हे देशाचे पहिले रक्षक आहेत, जे आपल्या प्राणांची पर्वा न करता देशाच्या सीमांचे रक्षण करतात आणि देशाच्या सुरक्षेचा आधारस्तंभ आहेत.असे मनोगत आ. बाबुराव कदम यांनी व्यक्त केले कार्यक्रमात दंपत्याचा सन्मान करून सत्कार करण्यात आला. पांडुरंग धोंडिबा घिसेवाड यांच्या पाच मुली च्या एकुलता एक भाऊ असून देशसेवा चा ज्वबा अंगी आलेल्या आपल्या सुपुत्राला देशसेवेसाठी पाठविले, मुलाचे लग्न दोन वर्षपूर्वी मुदखेड तालुक्यातील मेंडका येथील निकिता सोबत

---

उपक्रम | येल्लूर येथून लालपरी तीर्थयात्रेसाठी रवाना

# एसटी संगे तीर्थयात्रा योजनेचा पहिला प्रयोग

प्रतिनिधी । बाऱ्हाळी



#### राज्यातील २५१ आगारात एकाच वेळी मोहिम राबविण्यात येणार

सर्वसामान्य माणसाच्या जीवनाशी नाळ जोडून त्यांच्या श्रद्धेला सुरक्षिततेची आणि परवडणाऱ्या खर्चाची जोड देणारी एक लोकाभिमुख योजना उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्देशानुसार महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने साकारली आहे. दि. २३ जानेवारी पासून ही योजना राज्यातील २५१ आगारात एकाच वेळी राबविण्यात येणार आहे.

महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या मुखेड आगारातून हिंदू हृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे - एसटी संगे तीर्थयात्रा योजनेअंतर्गत मौजे यल्लूर येथून लाल परी रवाना करून मुखेड आगारातून आगार प्रमुख सुभाष पवार यांनी योजनेचा पहिला प्रयोग सुरू केला आहे.

त्या अनुषंगाने योजनेला प्रतिसाद देत मुखेड आगार प्रमुख सुभाष पवार यांनी पहिल्याच दिवशी म्हणजे दि. २३ जानेवारी रोजी तालुक्यातील मौजे येल्लूर येथून तीर्थयात्रेसाठी लाल परीचा शुभारंभ केला. यावेळी आगार प्रमुख सुभाष पवार यांच्या हस्ते तीर्थयात्रा बसचा शुभारंभ करून प्रवाशांना शुभेच्छा देण्यात आल्या. सदरील गाडी येलूर येथून तुळजापूर - पंढरपूर - शिंगणापूर - देहू आळंदी - जेजुरी - ज्योतिबा - कोल्हापूर - प्रतापगड - रायगड - गणपतीपुळे - नाणीज - नाशिक - त्र्यंबकेश्वर - सप्तगिरी - शिर्डी - परळी वैजनाथ येथून परत मुखेड - येल्लूर येणार आहे. यावेळी आगार प्रमुख म्हणाले की, महामंडळाची ही योजना प्रवाशांना योग्य दरात विविध ठिकाणच्या धार्मिक स्थळांचे दर्शन घडवण्यासाठी सुरू केलेली असून एक विशेष सेवा आहे. महाराष्ट्रातील प्रमुख तीर्थक्षेत्र आणि शक्तीपीठांचे दर्शन घडविणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे. गावातील एक गटप्रमुखांनी ४५ प्रवाशांची यादी व प्रवासाचे ठिकाण याची माहिती दिल्यास मंजुरी घेतल्यानंतर लालपरी गाडीची व्यवस्था करण्यात येईल. सदरील गाडीत ज्येष्ठ नागरिक, महिला सन्मान योजना, अमृत ज्येष्ठ योजना (७५ वर्ष पेक्षा जास्त), दिव्यांग व्यक्ती साठी सवलत अशा योजना लागू आहेत. करीता तालुक्यातील जास्तीत जास्त गावातील प्रवाशांनी या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन आगार प्रमुख सुभाष पवार यांनी केले आहे. लालपरी व मुखेड आगाराचा ताफा भल्या पहाटे येल्लूर गावात पोहोचताच नागरिकांनी समाधान व्यक्त करून अभिनंदन केले. यावेळी सत्यवान शिंदे पाटील, सूर्यकांत पवळे पाटील, चालक बी. एन. केंद्रे, वाहक बी. बी. गायकवाड सह गावातील महिला नागरिक उपस्थित होते.

---

# घरकुल योजनेच्या लाभार्थ्यांची आर्थिक लुबाडणूक केली जात असल्याची तक्रार

प्रतिनिधी । नांदेड

पंतप्रधान आवास आणि रमाई आवास योजनेच्या ग्रामीण भागातील घरकुल लाभार्थ्यांची आर्थिक लुबाडणूक केली जात असल्याची तक्रार जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक मेघना कावली यांच्याकडे एका लेखी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. तसेच या अपहार प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधित ग्रामसेवक,इंजिनिअर अशा संबंधित भ्रष्ट अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर तत्काळ कारवाई करावी, अन्यथा जिल्हा परिषदे समोर हलगी वाजवून उपोषण करण्यात येईल, असा आझाद आदिवासी सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष हणमंत मामीलवाड यांनी दिला आहे.

यानिमित्ताने दिलेल्या लेखी निवेदनात म्हटले आहे की, मुखेड तालुक्यातील ठाणा, सांगवी ( भा.), येवती अशा अनेक गावातील पंतप्रधान आवास आणि रमाई आवास योजनेच्या घरकुल लाभार्थ्यांची भ्रष्ट ग्रामसेवक, इंजिनिअर अशा अधिकाऱ्यांकडून आर्थिक लुबाडणूक केली जात आहे. प्रत्येकी ३० हजार रुपये घेतल्याशिवाय घरकुल मंजुरी आणि शासकीय अनुदान दिले जात नाही. जे दाम देतील, त्यांची कामे तत्काळ केली जातात, आणि जे दाम देत नाहीत, त्यांना वेठीस धरले जात आहे.

विशेष म्हणजे अशा प्रकारच्या भ्रष्ट कारभारातून ज्यांनी घरकुल प्रत्यक्षात बांधकाम केले नाही, अशांनाही आवास योजनेचा लाभ देण्यात आला आहे.यामुळे गोरगरिब आणि खऱ्या लाभार्थ्यांवर मोठ्या प्रमाणात अन्याय होत असून घरकुल योजनेपासून ते वंचित राहत आहेत.याप्रकरणी तक्रारी केल्यानंतरही मुखेड पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी आणि विस्तार अधिकारी यांच्याकडून मात्र भ्रष्ट अधिकाऱ्यांनाच अभय दिले जात आहे. यामुळे या आर्थिक गैरव्यवहाराची सखोल चौकशी करून संबंधित भ्रष्ट ग्रामसेवक आणि अधिकाऱ्यांवर निलंबनाची कठोर कायदेशीर कारवाई करावी, अन्यथा जिल्हा परिषदे समोर दि.११ फेब्रुवारी पासून हलगी वाजवून उपोषण करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे. तसेच राज्याचे मुख्यमंत्री, ग्रामविकास मंत्री,विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी यांच्यासह संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांना या निवेदनाच्या प्रती देण्यात आल्या आहेत. दरम्यान शासनाच्या दिलेल्या अनुदानात घरकुलाचा उद्देश पुर्ण व्हायाचा होता परंतू यामध्ये मा ठ्चया प्रमाणात निर्माण झाल्यामुळे खरे लाभार्थी वंचीत आहेत.याबाबतच विचार होणे खरी गरज आहे.संबंधीतांवर कारवाई व्हावी हि अपेक्षा.

---

### मुदखेड येथे प्रश्नोत्तरी स्पर्धेचे आयोजन

प्रतिनिधी । मुदखेड

येथील पी एम श्री केंद्रीय विद्यालय सीआरपीएफ येथे नेताजी सुभाष चंद्र बोस यांच्या जयंती पराक्रम दिनानिमित्त ''परीक्षा पे चर्चा'' या प्रधानमंत्री मोदीजींच्या उपक्रमांतर्गत ''ऑपरेशन सिंदूर'' व ''स्वदेशी'' या विषयांवर जिल्हास्तरीय प्रश्नोत्तरी चे आयोजन करण्यात आले.या स्पर्धेत जिल्ह्यातील केंद्रीय विद्यालय नांदेड, केंद्रीय विद्यालय मुदखेड, जवाहर नवोदय विद्यालय शंकर नगर तसेच इतर सीबीएससी व राज्य शासनाच्या शाळांचा सहभाग होता. या स्पर्धेमध्ये मध्य चरण (वर्ग ६ ते ८) मधील जवळपास ५० तसेच माध्यमिक चरण (वर्ग ९ ते १२) मधील जवळपास ५० विद्यार्थ्यांचा सहभाग होता. या स्पर्धेतील दोन्ही चरणांमधील तीन-तीन विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र व पारितोषिक देऊन सत्कार करण्यात आला. सत्कार समारंभाचे अध्यक्षस्थानी विद्यालयाचे प्राचार्य अजय चौकीकर व मुख्य पाहुणे म्हणून मुख्याध्यापक पांडुरंग फाजगे हे उपस्थित होते.